रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २९१
www.ramprahar.com
गुरुवार, ९ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## खेळणी उद्योगात भारत बनतोय आता 'ड्रॅगन'



**नवी दिल्ली :** कोरोना महामारीचा चीनच्या अर्थव्यवस्थेला जबरदस्त फटका बसला आहे. यामुळे चीन आणखी एका क्षेत्रात भारताकडून मागे पडत चालला आहे. या क्षेत्रात कधीकाळी चीनचा जबरदस्त दबदबा होता, मात्र गेल्या काही वर्षांत भारताची या क्षेत्रात घोडदौड सुरू आहे. हे क्षेत्र म्हणजे, टॉय मार्केट. भारतीय खेळणीची संपूर्ण जगात धूम बघायला मिळत आहे. भारतीय खेळणीची निर्यात वाढली असून चीनमधून होणारी आयात ७० टक्क्यांनी घटली आहे. आर्थिक वर्ष २०१५ ते २०२३ दरम्यान भारतीय खेळणीच्या निर्यातीत तब्बल २३९ टक्क्यांची वाढ झाली आहे. तर आयातीत ५२ टक्क्यांची घट झाली आहे. वाढत्या खेळणी उद्योगामुळे भारत आता एक मोठा निर्यातदार म्हणून उदयास येत आहे. तर या युद्योगातील चीनचा दबदबा कमी होताना दिसत आहे.

अंतरंग
काँग्रेस देशाचा दुश्मन; मुख्यमंत्री शिंदेंची टीका/२
पनवेल मनपा क्षेत्रातील पाणी समस्या लागणार मार्गी/३
राजस्थानच्या पराभवाने आरसीबीला धाकधूक/८

# राज्यात शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका जाहीर

## कोकण पदवीधर मतदारसंघाचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरिता निवडणूक होत असून यासाठी सोमवार, १० जून २०२४ रोजी मतदान होणार आहे.

विलास विनायक पोतनीस (मुंबई पदवीधर मतदारसंघ), निरंजन वसंत डावखरे (कोकण पदवीधर मतदारसंघ) किशोर भिकाजी दराडे (नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ) आणि कपिल



हरिश्चंद्र पाटील (मुंबई शिक्षक मतदारसंघ) हे ७ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगाने दोन शिक्षक मतदारसंघ व दोन पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

या निवडणुकीसाठी बुधवार, १५ मे २०२४ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. या निवडणुकीकरिता बुधवार, २२ मे २०२४ पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येईल. दाखल केलेल्या अर्जांची छाननी शुक्रवार, २४ मे २०२४ रोजी केली जाईल तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत सोमवार, २७ मे २०२४ अशी आहे. सोमवार, १० जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत या चारही मतदारसंघाकरिता मतदान होईल. गुरुवार, १३ जून २०२४ रोजी मतमोजणी होईल. ही प्रक्रिया १८ जून २०२४ रोजी पूर्ण होईल, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## डॉक्टर व अभिवक्ता यांच्याशी नमो संवाद




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, रासप, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ खांदा कॉलनीमध्ये बुधवारी (दि. ८) भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉक्टर व अभिवक्ता यांच्याशी नमो संवाद साधण्यात आला. (पान २ वर..)

# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली शिवशाही आणि रामराज्य आणणार

## ना. नितीन गडकरींचे चौकच्या सभेत आश्वासन



**चौक : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदार संघाच्या विकासात खासदार श्रीरंग बारणे यांचा सिंहाचा वाटा असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शिवशाही आणि रामराज्य आणणार, असे आश्वासन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. मावळ लोकसभा मतदार संघातील शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचाराची जाहीर सभा खालापूर तालुक्यातील चौक येथे मंगळवारी झाली, त्यावेळी तुफान गर्दीत झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी व्यासपीठावर शिवसेना नेते गजानन किर्तीकर, रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार देवेंद्र साटम, सुरेश लाड, ज्येष्ठ नेते अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष भोईर, रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, सरपंच रितू ठोंबरे यांच्यासह महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिनमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीचा वेग तिप्पट झाला आहे. मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात केलेले काम हा फक्त ट्रेलर होता, खरा चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे. प्रत्येकाला घर, गावागावात पाणी, शाळा, दवाखाना, रस्ता, वीज, शेतीमालाला भाव व रोजगार हे आमचे उद्दिष्ट आहे. आपल्या देशाला भय, भूक, दहशतवाद व भ्रष्टाचार यापासून मुक्त करायचे आहे. या देशात छत्रपती शिवाजी महाराजांची शिवशाही आणि प्रभू रामचंद्रांचे रामराज्य आणण्यासाठी नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणे आवश्यक आहे. त्यासाठी मावळच्या मतदारांनी धनुष्य बाणचे बटण दाबून श्रीरंग बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहनही ना. गडकरी यांनी या वेळी केले.

रस्ते विकासामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार व होत असल्याचे सांगून मावळ लोकसभा सभा मतदारसंघात जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) विकसित झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. पनवेल ते उरण हा आठ पदरी रस्ता पूर्ण झाला आहे. पागोटे ते चौक हा ४५०० कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम निवडणुकीनंतर सुरू होईल व पुढील एक-दीड वर्षात पूर्ण होईल, याची हमी दिली. या रस्ते विकासाबरोबरच रस्त्यांच्या कडेला लॉजिस्टिक पार्क व इंडस्ट्रियल हब होतील व त्यातून किमान दहा हजार तरुणांना रोजगार मिळेल. या नोकऱ्यांमध्ये ८० टक्के जागा या स्थानिक भूमिपुत्रांना मिळाव्यात, अशी शासनाची भूमिका राहणार असल्याचे सांगितले.

कळंबोली जंक्शन येथील वाहतूक समस्येवर प्रभावी उपाययोजना म्हणून बहुमजली उड्डाणपूल बांधण्यात येणार असून सुमारे १६०० कोटी रुपये खर्चून हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प उभारण्यात येईल. हे कामही निवडणुकीनंतर सुरू होईल, असे त्यांनी सांगितले. सागरमाला प्रकल्पांतर्गत या भागात तब्बल दोन लाख कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री सडक योजनेंतर्गत साडेचार लाख गावांना रस्त्याने जोडण्यात आले आहे. अजून दोन लाख गावांना रस्त्याने जोडण्याचे काम सुरू आहे किंवा व्हायचे आहे, या सरकारने आत्तापर्यंत ५० लाख कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

काँग्रेसवर टीका करतांना ते म्हणाले, देशात कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत रस्त्यांची कामे सुरू आहेत. रस्ते झाले की विकास होतो. त्यातून रोजगार मिळतो आणि त्यातून गरिबी दूर होते, याकडे गडकरी यांनी लक्ष वेधले. काँग्रेसने गरीबी हटावचा नारा दिला होता, पण त्यातून फक्त काँग्रेसवाल्यांची गरिबी दूर झाली, असा टोलाही त्यांनी लगावला.

देशात एवढे मोठे रस्त्यांचे जाळे उभे करू शकलो, याचे सर्व श्रेय पुन्हा मतदारांना आहे, असे सांगून गडकरी म्हणाले की, तुम्ही भरघोस मतांनी बारणे यांना निवडून दिले नसते, तर मोदी पंतप्रधान झाले नसते आणि मीदेखील मंत्री झालो नसतो. त्यामुळे देशातील विकासाचे सर्व श्रेय मतदारांना जाते. मावळ लोकसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे करण्यात खासदार बारणे यांचा सिंहाचा वाटा आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. बारणे हे प्रत्येक कामाचा चिकाटीने पाठपुरावा करतात. त्यामुळे ती सर्व कामे आम्हाला करावी लागतात, असेही ते म्हणाले. केंद्रात व राज्यात एकाच विचारांची सरकारे असल्यास विकासाला अधिक गती मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिनमुळे महाराष्ट्राच्या विकासाची गती तिपटीने वाढल्याचे त्यांनी सांगितले. (पान २ वर..)

## निवडक

### पंतप्रधान मोदी, राज ठाकरेंची मुंबईत होणार एकत्रित सभा

**मुंबई :** लोकसभा निवडणूकीमध्ये मुंबईतील सर्व उमेदवारांसाठी शुक्रवार, १७ मे रोजी शिवाजी पार्क येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची एकत्रित जाहीर सभा होणार आहे, असे बाळा नांदगावकर यांनी लोकसभा निवडणूक प्रचार संदर्भातील बैठकीत सांगितले. दरम्यान, राज ठाकरे यांची महायुतीच्या प्रचारार्थ पहिला सभा कणकवलीत झाली होती.

### मोफत आधार अपडेटची मुदत आणखी वाढवली

**नवी दिल्ली :** आधार कार्डमध्ये कोणताही बदल करायचा असल्यास त्यासाठी ५० रुपये शुल्क आकारले जाते, मात्र सध्या ही प्रक्रिया अगदी मोफत उपलब्ध आहे. युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडियाने काही महिन्यांपूर्वी ही प्रक्रिया मोफत उपलब्ध केली होती. याची मुदत आता आणखी वाढवण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, आता तुम्ही १४ जूनपर्यंत आपल्या आधार कार्डमधील डीटेल्स मोफत अपडेट करू शकता.

## काँग्रेस नेते सॅम पित्रोदांचे भारतीयांबाबत वर्णभेदी वक्तव्य



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या दक्षिणेकडे राहणारे लोक आफ्रिकन लोकांसारखे तर ईशान्य भारतातील लोक हे चीनी लोकांप्रमाणे दिसतात, असे राहुल गांधींचे राजकीय सल्लागार सॅम पित्रोदा यांनी म्हटलेय. त्यांच्या या वक्तव्याचे देशभरातून पडसाद उमटत आहेत. इंडियन ओवरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा पुन्हा एकदा चर्चेत आहेत. त्यांनी या वेळी भारतातील विविधतेने नटलेल्या संस्कृतीबद्दल हैराण करणारे वक्तव्य केले आहे. सॅम यांनी भारताच्या वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या लोकांची रंग, रूप यावरून वेगवेगळ्या देशांशी तुलना केली आहे.

दक्षिण भारतात राहणारे लोक आफ्रिकन लोकांसारखे तर ईशान्य भारतातील रहिवासी चीनी लोकांसारखे दिसतात, असं वक्तव्य काँग्रेसचे नेते सॅम पित्रोदा यांनी केले आहे. या वक्तव्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे.

पित्रोदांच्या वक्तव्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्यापासून ते भाजपच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत अनेकांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. वादग्रस्त विधानामुळे टीकेचे धनी ठरलेले इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे.

### भारतीय जनतेचा अपमान संतापजनक -पंतप्रधान मोदी


*इंडियन ओवरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खरपूस समाचार घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेलंगणच्या वारंगल निवडणूक प्रचारसभेला संबोधित करताना त्यांनी वक्तव्याचा निषेध केला. ते म्हणाले की, आज मी भरपूर रागात आहे. मला शिवी दिली, मी सहन केले, पण शहजादे म्हणजे राहुल गांधीच्या सल्लागाराने जे म्हटले, त्याने मला राग आलाय. हा माझ्या देशातील लोकांच्या कातडीच्या रंगाचा अपमान आहे.*

## राज्य सेवा पूर्वपरीक्षेचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ची परीक्षा शनिवार, ६ जुलै २०२४ रोजी होणार आहे. शासनाकडून प्राप्त सुधारित मागणीपत्रानुसार महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील एकूण ५२४ पदांचा सुधारित सविस्तर तपशील आयोगाच्या संकेत स्थळावर देण्यात आले असल्याचे आयोगाने कळविले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता २९ डिसेंबर २०२३ रोजी एकूण २७४ रिक्त पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिरातीनुसार परीक्षा २८ एप्रिल २०२४ रोजी घेण्याचे नियोजित होते. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, २६ फेब्रुवारी २०२४ नुसार आयोगाच्या २१ मार्च २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रस्तुत परीक्षा पुढे ढकलण्यात आली असल्याचे जाहीर करण्यात आले होते.




## मतदान जनजागृतीसाठी पनवेलमध्ये स्वाक्षरी अभियान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवरती स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्यावतीने 'स्वाक्षरी अभियान' राबविले जात असून प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी स्वाक्षरी फलकावरती स्वाक्षरी करून या अभियानाचे उद्घाटन केले.

या स्वाक्षरी अभियानांतर्गत मोठा स्वाक्षरी फलक महापालिका मुख्यालयात उभा करण्यात आला आहे. उद्घाटनावेळी उपस्थित सर्वांनी आपली स्वाक्षरी करून मतदान करण्याबाबत संदेश सर्वांना दिला. या पध्दतीने वडाळा तलाव व पनवेल रेल्वे स्थानकावरती देखील स्वाक्षरी अभियान राबविण्यात येणार आहे.

याबरोबर ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांत आशासेविका बैठका घेऊन मतदार जनजागृती करत आहेत तसेच चारही प्रभागामध्ये घरोघरी जाऊन मतदान जनजागृतीपर पत्रकाचे वाटप करत आहेत. तसेच महापालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पनवेल, वळवली व पंचशील नगर येथे बचत गटांच्या बैठका घेऊन मतदान करण्याबाबत जनजागृती केली जात आहे. (पान २ वर..)

## 'उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वामुळे मराठी माणूस निर्वासित'



**मुंबई :** मराठी माणसाचे ठेकेदार ते नाहीत. ते म्हणजे मराठी नाहीत, ते म्हणजे महाराष्ट्र नाही. आम्हीही मराठी माणूस आहोत. आमचा पक्षही मराठी माणसाच्या पाठीशी आहे. खऱ्या अर्थाने मराठी माणसाला निर्वासित कुणी केले असेल, तर ते उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात झाले आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मीडियाशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्या पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याच्या विधानावरही भाष्य केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट हा जो पक्ष आहे, तो काँग्रेसमध्ये विलीन करावा, असे त्यांच्या डोक्यात असेल. त्यात काही नवल नाही. यापूर्वीही शरद पवारांनी अनेकवेळा पक्ष तयार केला आणि अनेकवेळा काँग्रेसमध्ये गेले. त्यामुळे त्यांनी हा एक संकेत दिला आहे की, आता त्यांचा पक्ष चालवणे त्यांना शक्य होणार नाही. लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार साहेबांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करतील, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# पनवेल मनपा क्षेत्रातील पाणीसमस्या लागणार मार्गी

## अमृत अभियानांतर्गत कामांची आयुक्तांकडून पाहणी

**पनवेल : वार्ताहर**

केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील २९ गावांकरिता पाणीपुरवठा योजनेस मंजुरी प्राप्त आहे. या योजनेंतर्गत सद्यस्थितीत ११ ठिकाणी जलकुंभाची कामे सुरू आहेत व ५७ किमी लांबीची जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. नुकतीच या कामाची पाहणी आयुक्त प्रशांत रसाळ यांनी केली. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपअभियंता विलास चव्हाण, सल्लागार प्रतिनिधी व ठेकेदार उपस्थित होते.



या वेळी आयुक्तांनी पावसाळ्यापूर्वी सुरू असलेली सर्व जलकुंभाची कामे सुरक्षित पातळीपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदारांना दिल्या, तसेच जलवाहिन्या टाकण्याकरिता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची कामे २५ मेपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत.

अमृत २.० अभियानांतर्गत पनवेल महापालिकेने २९ गावाच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मांडला होता. त्यास मंजुरी मिळाली असून, या अंतर्गत एकूण ३१ पाण्याच्या टाक्या व १७९ किमी लांबीची वितरण व्यवस्था करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. या योजनेमुळे महापालिका कार्यक्षेत्रातील २९ गावांना मुबलक पाणीपुरवठा करणे सोयीचे होणार आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे, वीर वाजेकर, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे येथे बुधवारी (दि.८) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचे पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे लेखापाल (सीए) एकनाथ पाटील यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यादानासारखे श्रेष्ठदान दुसरे कुठलेच नाही. वारकरी संप्रदायाचा वारसा लाभलेले एकनाथ पाटील यांनी, आध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालून माणसाला जगता यायला हवे. शिक्षकांनी आपले काम अत्यंत प्रामाणिकपणे करायला हवे. विद्यार्थ्यांना उद्देशून शिक्षणाने माणूस केवळ साक्षर होतो, असे नाही तर तो सज्ञान व्हायला हवा. जगातील प्रत्येक गोष्टीवर कर आकारला जातो. फक्त विद्यादानावर कसलाही कर आकारला जात नाही. विद्या ही दिल्याने वाढते, असे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी, प्रमुख पाहुण्यांच्या भाषणाचा गोषवारा मांडून आजच्या विद्यार्थ्याने उच्च शिक्षण, व्यवसाय, उद्योग तसेच स्वतःचा व्यवसाय केला पाहिजे. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विकासात सहकार्य करणे गरजेचे आहे. महामुंबईच्या जवळ असणाऱ्या महाविद्यालयात





तुम्ही शिकत आहात, शिकून बाहेर पडला तरी तुमचे आणि महाविद्यालयाचे नाते कायम राहिले पाहिजे. उद्योग नगरीच्या जवळ असणाऱ्या तुम्हा विद्यार्थ्यांना खूप संधी खुणावत आहेत, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. विलास महाले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. राहुल पाटील यांनी करून दिला. कला शाखेच्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमानपत्रांचे वाचन डॉ. विलास महाले यांनी केले. वाणिज्य शाखेचे प्रमाणपत्र वाचन प्रा. संतोष देसाई यांनी केले, तसेच विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वाचन डॉ. आमोद ठक्कर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. संतोष देसाई यांनी मानले.

# बेपत्ता मुलांना पोलिसांनी शोधले

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील फूडलॅण्ड कंपनीजवळील आदिवासी वाडीतून पाच मुलांचे अपहरण झाल्याची तक्रार पोलिसांकडे सोमवारी रात्री करण्यात आली होती. या मुलांचा शोध घेण्यासाठी तीन वेगवेगळ्या पथकांनी शोध घेतल्यानंतर ही मुले करंजाडे येथील मामाच्या घरात झोपल्याचे पोलिसांना आढळले.

पोलिसांना पाहून पळून गेलेल्यांपैकी दोन मुले पुन्हा शिरढोण येथील त्यांच्या नातेवाईकांकडे लपली होती. अखेर मंगळवारी उशीरा त्यांनाही सुरक्षित कळंबोली पोलिसांनी शोधून काढून पालकांच्या स्वाधीन केले.

कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांनी या गंभीर प्रकरणातील मुलांच्या शोधासाठी एक अधिकारी व चार कर्मचारी नेमले होते.

पेणधर, तळोजा, शिरढोण असे नातेवाईकांच्या घरी शोधल्यानंतर करंजाडे येथील एका नातेवाईकाचे घर शोधल्यावर ही मुले पोलिसांना झोपलेल्या अवस्थेत सापडली. १५ ते १६ वर्षे वयोगटातील ही मुले असून यामध्ये चार मुली व एक मुलाचा समावेश आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे रक्तदान शिबिर

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जसलोक हॉस्पिटल मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.८) सीबीडी बेलापूर रेल्वेस्टेशनवर भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.

रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे वेगवेगळे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम घेत असते. त्याचाच एक भाग म्हणून आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये रक्ताची गरज लक्षात घेता या रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये सीबीडी



बेलापूर स्टेशनवर येणाऱ्या-जाणाऱ्या सुमारे १०० प्रवाशांनी रक्तदान केले. हा सामाजिक उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या शिबिराचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी केली तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. राजश्री म्हात्रे व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# एनआरआय सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेवारस वाहनांचा लिलाव

**पनवेल : वार्ताहर**

एनआरआय सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेवारस वाहनांचा लिलाव होणार आहे.

एनआरआय सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिसरामध्ये अपघातामध्ये, बेवारस स्थितीमध्ये बंद पडलेली वाहने, बऱ्याच कालावधीनंतरही वाहनमालकांनी त्यांची वाहने ताब्यात घेतलेली नाहीत, तसेच गुन्हेगारांनी चोरी करून बेवारस स्थितीमध्ये वाहन रस्त्याच्या बाजूला उभी करून गेल्याने वाहनाबाबत चोरीविषयक गुन्हे दाखल झाले आहेत.

या वाहनांचा लिलाव करण्यात येणार असल्याने जे लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ शकतात, अशा परवानाधारकांनी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांनी दिली आहे.

# उरणमधील उंचीरोधक हटविल्याने नागरिकांना दिलासा

## वाहतूक विभागाच्या अधिसूचनेनंतर कार्यवाही

**उरण : रामप्रहर वृत्त**

उंची रोधकामुळे उरण-पनवेल या मुख्य मार्गावरील एसटीची प्रवासी बससेवा मागील तीन वर्षांपासून बंद आहे. हे उंचीरोधक सोमवारी रात्री हटविण्यात आले आहेत. त्यामुळे बोकडवीरा, फुंडे, डोंगरी आणि पाणजे येथील हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



याबद्दल आनंदही व्यक्त केला जात आहे, मात्र हे उंचीरोधक हटविण्यात आल्याने मार्गावरील एसटी बससेवा पूर्ववत करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

नवी मुंबई वाहतूक विभागाने उरण-पनवेल मार्गावरील नादुरूस्त खाडीपुलाच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले उंचीरोधक हटविण्याची अधिसूचना आठवड्यापूर्वी काढली होती. त्यामुळे मार्गावरील उंचीरोधक लवकरात लवकर हटविण्याची मागणी करण्यात येत होती. अखेर रात्रीच्या वेळी वाहतूक विभाग आणि सिडकोच्या माध्यमातून हे उंचीरोधक हटविण्यात आले आहेत.

उंचीरोधकामुळे मागील तीन वर्षांपासून या मार्गावरील प्रवासी वाहतुकीचे एकमेव साधन असलेली एसटी बस सेवा बंद करण्यात आली आहे.

वाहतूक विभागाने काढलेल्या अधिसूचनेनंतर सिडकोने उरण- पनवेल मार्गावर बसविण्यात आलेले बोकडवीरा आणि फुंडे हायस्कूलनजीकचे उंचीरोधक हटविण्यात आले आहेत.

# पनवेलमध्ये किड्स समर कॅम्प, मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

## ◆ आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय मल्हार मित्र मंडळ पनवेल आणि टीडब्लूजे कंपनीच्या वतीने दोन दिवसीय किड्स समर कॅम्पचे आणि मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या समर कॅम्पचा शुभारंभ तसेच फिरत्या वाचनालयाचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि.८) झाले. या कॅम्पला पनवेल महापालिकचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनही भेट देत शुभेच्छा दिल्या.

पनवेलमधील जय मल्हार मित्र मंडळाच्या वतीने सार्वजनिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात. यामध्ये क्राफ्ट, पेंटिंग, डान्स, ॲक्टिंग वर्कशॉप तसेच योगा यावावत मुलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

दरम्यान जय मल्हार मित्र मंडळ आणि टीडब्लूजे कंपनीच्या






वतीने फिरते वाचनालयही सुरू केले आहे. दर्जेदार मराठी साहित्य लोकापर्यंत सवलतीच्या दरात पोहचवण्याचे या मागचे उद्दिष्ठ्य आहे. या फिरत्या वाचनालयाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कॅम्पनिमित्त सुमनशिल नेत्रालयाच्या वतीने मोफत नेत्रचिकीत्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, अर्चना ठाकूर, स्वाती कोळी, दिप्ती खिस्मतराव, माधुरी गोसावी, भाजपचे युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, जय मल्हार मित्र मंडळाचे अध्यक्ष मयुरेश विस्मतराव, गणेश मंजुळे, शेखर मंजुळे, किरण चंदणे, अमोल चंदणे, रवि चंदने, मंदा भगत, प्रनिल माळी, अभिषेक विस्मतराव, प्रदीप शहा, आदित्य डिंगोरकर उपस्थित होते.



# वडाळे तलाव परिसरातील झाडांना पाणी घालणारा अवलिया

## मुकुंद गोंधळेकर यांचा नित्यनियमाचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

वडाळे तलाव हा मोठा तलावाचा परिसर आहे. या तलावासभोवताली पनवेल महापालिकेने सुशोभीकरण केले आहे. अनेक प्रकारची झाडे लावली, ती झाडे मोठी होत आहेत. या झाडांच्या संवर्धनासाठी ८२ वर्षांचा अवलिया मुकुंद गोंधळेकर हे नित्यनियमाने पाणी घालतात.





या तलावाच्या प्रदक्षिणा मार्गावर आवश्यकतेपेक्षा महापालिकेने दगडी बांधकाम केले आहे. ऊन आणि कडक उन्हात दगडी बांधकाम खूप तापते. त्याचा परिणाम येथील झाडांवर होतो. झाडांना जर पाणी मिळाले नाही तर झाड सुकून जातात. पाणी अगदी उशाशी पण झाडांना पाणी मिळत नाही, हे मुकुंद गोंधळेकर यांच्या लक्षात आले. त्यांनी पाऊस संपल्यापासून या प्रदक्षिणा मार्गावरील झाडांना पाणी घालणे सुरू केले. छोट्या-मोठ्या कॅनद्वारे तलावातील पाणी घेऊन ते झाडांना पाणी घालतात. त्यांचे हे काम पाहून त्यांना या कामी मॉर्निंग वॉक करणारे नागरिक आणि वडाळे तलाव योगा ग्रुप त्यांना मदत करते. हे त्यांचे काम नित्यनियमाने चालू आहे.

प्रदक्षिणा मार्गावर लावलेल्या झाडांच्या सभोवताली जी रिकामी जागा आहे त्या रिकाम्या जागेत वेली लावल्या आणि त्या भिंतीवर सोडल्या तर अजून हिरवाई निर्माण होऊ शकेल, असे मुकुंद गोंधळेकर यांचे मत आहे. ही सार्वजनिक मालमत्ता आहे, लोकांची मालमत्ता आहे पण त्याकडे कोणी पाहत नाही. झाडांना पाणी देणे हे शासकीय यंत्रणेचे हे काम आहे, पण ते करत नाहीत पण आपली ही जबाबदारी आहे. म्हणून कर्तव्यापोटी मुकुंद गोंधळेकर हे काम चोखपणे करीत आहेत. येथील झाडांना पाणी देताना मी लोकांमध्ये झाडांविषयी जनजागृती ही करीत आहेत. त्या लोकांचा सहभाग मिळत आहे. झाडे लावली,ती जगवली तरच आपले जीवन सुखी होणार आहे, असे मुकुंद गोंधळेकर यांनी बोलताना सांगितले.

# चिरनेर येथे श्री संत गोरोबाकाका पुण्यतिथी सोहळा उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील चिरनेर येथील प्रसिद्ध कलानगरमध्ये श्री संत गोरोबाकाका पुण्यतिथी उत्सव सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

या वेळी विठ्ठल रखुमाई, साईबाबा आणि श्री संत गोरोबाकाकांची महापूजा व अभिषेक करण्यात आला. रविवारी श्री संत शिरोमणी गोरोबा काकांच्या पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी श्री संत गोरोबाकाकांचा पुण्यतिथी उत्सव सोहळा पार पडला. या वेळी जानकीबाई इंगळे यांची नात



संगीता संजय धुरू (ठाणे) यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सद्‌गुरु माऊली हासुराम बाबा यांच्या आध्यात्मिक पौर्णिमा मंडळाच्या माध्यमातून महाआरती घेण्यात आली. रवींद्र मुंबईकर यांच्या संतकृपा प्रासादिक भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. जिज्ञासा मुंबईकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भजने गायली. श्रीराम प्रसादिक भजन मंडळ यांच्याही भजनाचा कार्यक्रम पार पडला. बुवा वसंत चिर्लेकर, वामन म्हात्रे, विश्वास मोकल यांनी सहभाग घेत भजने गायली.

या वेळी लहान मुलांच्या क्रीडा स्पर्धा, फनी गेम्स, महिलांसाठी हळदीकुंकू, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, महाआरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सचिन कुंभार, दिगंबर बिरवाडकर, हेमंत वरवटकर यांना अभिषेकाचा मान देण्यात आला.

## संपादकीय

# घसरलेला टक्का कुणाचा?

तिसऱ्या टप्प्यातील मतदानाची सरासरी काहीशी कमी असली तरी चिंता करावी अशी नक्कीच नाही. राज्यातला हा घसरलेला टक्का कुणाच्या पथ्यावर पडणार याचा काथ्याकूट आता राजकीय पंडित करू लागले आहेत, आणि समाजमाध्यमांवर तर मतामतांच्या गलबल्याचा महापूर वाहू लागला आहे. अर्थात कमी झालेले मतदान कुणाच्या पथ्यावर पडणार याचे उत्तर ४ जून रोजी निकालाच्या दिवशीच मिळणार हे नक्की.

**देशभर सुरू असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीचा तिसरा टप्पा मंगळवारी पार पडला. या तिसऱ्या टप्प्यात सर्वत्र बऱ्यापैकी उत्साहात मतदान झाल्याचे पाहायला मिळाले. एकंदर ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ९३ मतदारसंघांमध्ये ६३ टक्के मतदानाची नोंद झाली. ही नोंद अर्थात समाधानकारकच म्हटली पाहिजे. सर्वाधिक मतदान आसाममध्ये झाले तर अपेक्षेपेक्षा काहीशा कमी मतदानाची नोंद महाराष्ट्रात झाली. ताज्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात सरासरी ६१ टक्क्यांच्या वर मतदान झाले आहे. राज्यातील घसरलेली आकडेवारी ही महायुतीच्या मुळावर येणार अशी हाकाटी विरोधकांनी आपल्या प्रचारात सुरू केली आहे, आणि त्याच वेळेस विरोधीपक्षांतील समन्वयाचा अभाव आणि निवडणुका एकतर्फी होण्याच्या भाकितामुळे 'इंडिया आघाडी'चे तथाकथित मतदार बाहेर पडलेच नाहीत, असे सत्ताधारी महायुतीचे समर्थक म्हणत आहेत. देशातील सार्वत्रिक निवडणुकीत मतदान घटण्यामागे अनेक कारणे असू शकतात. त्यामध्ये स्थानिक समीकरणे, हवामानातील बदल याचेही प्रतिबिंब पडत असते. यंदाचा घसरलेला टक्का अगदीच चिंता वाटावी असा नक्कीच नाही. मतदानाच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत काही चढउतार होतच असतात. उरलेल्या टप्प्यांमध्ये कदाचित ही टक्केवारी वाढू शकेल अशीही शक्यता आहेच. महाराष्ट्रात सर्वाधिक मतदान कोल्हापुरात ७० टक्क्यांच्या वर झाले तर सर्वांत कमी बारामतीमध्ये! येथील पवार परिवारातील लढतीकडे राज्यभरातील सर्वांचेच लक्ष लागून राहिले होते. या लढतीला राजकीय महत्त्व तर होतेच, पण तिला भावनिक किनारही होती. तिथेच टक्केवारी घसरल्यामुळे चर्चा नक्कीच सुरू झाली आहे. या मतदारसंघात अनेक नाट्यमय घडामोडी घडल्याचे पहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरद पवार गटाच्या नेत्यांनी एकमेकांवर असंख्य आरोप-प्रत्यारोप केले. निवडणूक आयोगाकडे शेकडो तक्रारी करण्यात आल्या. मतदारांनी मात्र मतदानकेंद्रांकडे पाठच फिरवली. अंतिम आकडेवारीनुसार २०१९च्या तुलनेत इथे जवळपास दोन टक्क्यांची घट झाली असून ते ५९.३७ इतके खाली घसरले. राज्यात लातूर येथे ६०.१८, सांगली येथे ६०.९५, बारामती येथे ५६.७, हातकणंगले येथे ६८.७, माढा येथे ६२.१७, उस्मानाबाद येथे ६०.९१, रायगड येथे ५८.१०, रत्नागिरी-सिंधुदुर्ग ५९.२३, सातारा ६३.५, सोलापूर ५७.६१ टक्के मतदानाची नोंद झाली. महाविकास आघाडी आणि महायुतीचे समर्थक आता घसरलेला टक्का हा आपल्याच बाजूने कौल देणार याची नवनवी तर्कटे देऊ लागले आहेत. वास्तविक यंदाच्या राज्यातील निवडणुकीतील राजकीय परिस्थिती इतकी गुंतागुंतीची आहे की ठामपणाने काही अंदाज व्यक्त करणे कठीण व्हावे. तीन टप्पे पार पडल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या गोटात मात्र समाधानाचे वातावरण असल्याचे दिसते. भाजपसारखा शिस्तबद्ध पक्ष निवडणुकीची तयारी फार आधीपासून सुरू करतो. पन्नाप्रमुखांच्या नेमणुकीनंतर या प्रक्रियेला खरा वेग येतो. भाजप कार्यकर्त्यांचा कानोसा घेतल्यास, पक्षाला सोयीचे मतदान झाल्याचे कानावर येते. अर्थात मतदार राजाच्या मनात काय आहे हे निकालाच्या दिवशीच खरे तर कळेल. तोवर सगळ्यांनीच वाट बघायला हवी.**

# विहिरींमध्ये जलपुनर्भरणाची संकल्पना राबविण्याची गरज

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात बोअरवेलचे प्रमाण गेल्या चार वर्षांमध्ये सातत्याने वाढत असताना जिल्ह्यातील सर्वाधिक भुजलाचे दुषित नमूने तालुक्यामध्ये आढळून आले आहेत. सहा वर्षांपूर्वी पुणे येथील रासायनिक पृथ:करण प्रयोगशाळेने ग्रामीण रुग्णालयाबाहेर केलेल्या उत्खननादरम्यान तालुक्यातील भुजलाचा अहवाल गोपनीय अहवाल सादर केला होता, मात्र त्याकडे दूर्लक्ष करून पाणीटंचाई निवारणाच्या राजकीय प्रतिष्ठेपोटी बोअरवेलची संख्या वाढत गेली असल्याने ही दूषित पाणी नमून्यांची परिस्थिती निर्माण झाली असल्याचे मत काही आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

पोलादपूर तालुक्याच्या पाणीटंचाई उपाययोजना कृती आराखड्यामध्ये पोलादपूर पंचायत समितीमार्फत २०१०-११ मध्ये तीनवेळा बोअरवेल आराखडा प्रस्तावित करण्यात आला. पहिल्या आराखडयात १ जानेवारी ते ३१ मार्च २०१० दरम्यान १५ गांवे आणि ६१ वाडयांचा समावेश या बोअरवेल प्रोग्राममध्ये करण्यात आला. १ एप्रिल ते ३० जून २०१० च्या बोअरवेल प्रोग्राममध्ये ८ गावांचा १३ वाडयांचा समावेश करण्यात आला. १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०११ या कालावधीतील पाणीटंचाई निवारण कृती आराखडयामध्ये ४२ गावे आणि १७२ वाडयांमध्ये अशा एकूण २१४ ठिकाणी बोअरवेलची उपाययोजना करण्यासाठी प्रस्ताव करण्यात आला. याच पाणीटंचाई निवारण कृती आराखडयामध्ये १ जानेवारी ते ३१ मार्च २०१२ मध्ये ४ गावे आणि २२ वाड्या अशा एकूण २६ ठिकाणी बोअरवेल खणण्याचा प्रस्ताव करण्यात आला. या पाणीटंचाई निवारण कृती आराखडयामध्ये ३१ डिसेंबरपर्यंतची बोअरवेलची प्रस्तावित मागणी आणि ३१ मार्च २०१२ पर्यंत बोअरवेलची प्रस्तावित मागणी पाहता आता प्रत्यक्ष आराखडयात तातडीने मंजूरी होऊ शकेल, अशी संख्या केवळ २६ बोअरवेलची असल्याने यामध्ये ४० बोअरवेलची विशेष अत्यावश्यक बाब म्हणून मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी आणि जिल्हा पाणीटंचाई निवारण कृती समितीकडे सादर करण्यात आला. यामुळे तालुक्यात प्रचंड प्रमाणात भुजल उपशासाठी बोअरवेल करण्यात आल्याचे निष्पन्न होत आहे. याखेरिज, नळपाणीपुरवठा योजनांच्या साठवण टाक्यांना झाकणे बसविली नसणे, पाणीपुरवठयाचे स्त्रोत स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न नसणे, नळयोजनेच्या पाईपलाईनची गटार व अन्य भागातून जोडणी, गंजलेले पाईप अशा अनेक बाबी पेयजलाचे नमूने दूषित असण्यास कारणीभूत ठरले आहेत.


पोलादपूर तालुक्यात आतापर्यंत विंधनविहिरी दुरूस्ती आणि विंधनविहिरी घेण्याच्या उपाययोजनांमुळे पोलादपूर तालुक्यात भुमातेला हजारो छिद्र पाडून दररोज लाखो लिटर्स पाण्याचा उपसा केला जात असून भुजलाचा पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात घटत आहे. भूगर्भातील पाणी उपसून झाल्यानंतर पुन्हा धरणी मातेचे पाण्याचे ऋण फेडण्यासाठी जलपुनर्भरण करण्याची निरुपणकार डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांची संकल्पना ग्रामीण भागातही युध्दपातळीवर राबवली असून दरवर्षी पावसाळ्यामध्ये विंधनविहिरींमध्ये छपरावरून वाहून जाणारे पाणी पुन्हा भरल्यास बारमाही जलस्त्रोत खुला राहू शकतो.

# एक थोर समाजसुधारक कर्मवीर भाऊराव पाटील

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक होते. 'स्वावलंबनाने कष्ट करून शिका' हा त्यांचा मंत्र होता. सर्वसामान्य जनतेपर्यंत शिक्षणप्रसार करण्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. भाऊरावांनी मागास आणि गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू करून मोठे काम केले. ते जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. भाऊराव पाटील यांना १९५९ साली त्यांच्या कार्याबद्दल 'पद्मभूषण' हा पुरस्कारही मिळाला. आज ९ मे त्यांची पुण्यतिथी आहे. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आपण त्यांच्या एकंदरीत आयुष्याविषयी जाणून घेणार आहोत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज गावात शेतकरी कुटुंबात झाला. भाऊराव यांनी लहानपणापासुनच आपले आयुष्य जात-पात न पाळता असपृश्यांसोबत आणि त्यांच्यासाठी खर्ची घातले होते, त्यांच्यावर राजर्षी शाहु महाराज यांच्या कामाचा मोठा प्रभाव होता. भाऊरावांनी दलित व अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी महत्वपूर्ण काम केले होते, कमवा आणि शिका योजना तसेच रयत शिक्षण संस्था ही त्याच कामाची उदाहरणे आहेत.

भाऊराव पाटील यांचे प्राथमिक शिक्षण विटा येथे झाले. त्यानंतर विद्यालयीन शिक्षण राजाराम हायस्कूल- कोल्हापूर येथे झाले. ते जैन बोर्डिंगमध्ये राहात होते. त्यानंतर भाऊराव सातारा येथे आले आणि त्यांनी शिकवण्या घेण्याचे काम सुरू केले. त्याच काळात त्यांनी दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. त्यांना माधवअण्णा मास्तरांनी साथ लाभली. भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या साथीने त्यांनी सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. त्यांनी ओगले ग्लास फॅक्टरी आणि किर्लोस्कर कारखान्यात काही काळ नोकरी केली; परंतु नोकरीत त्यांचे मन रमले नाही.



४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजया दशमीच्या मुहूर्तावर त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना कऱ्हाड जवळच्या काले गावात केली. सन १९२४ मध्ये रयतचे कार्यालय सातारा येथे हलवण्यात आले. रयत शिक्षण संस्था स्थापण्यामागील महत्त्वाचा उद्देश म्हणजे, मागासवर्गीयांमध्ये शिक्षणाबद्दल आवड निर्माण करणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विना फी शिक्षणाच्या संधी निर्माण करणे, सर्व जाती-धर्मांच्या मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे, सामाजिक सुधारणांसाठी जुन्या प्रथा, रूढी- परंपरा, चालीरीती बंद करणे, एकत्र काम करण्यावर भर देणे आणि एकी हेच बळ याचा पुरस्कार करणे, विद्यार्थ्यांना चांगले वळण लावणे, वरिष्ठांबद्दल त्यांच्या मनात आदरभाव निर्माण करणे, विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे करणे, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवून त्यांना महत्त्वाकांक्षी बनवणे, त्यांना स्वाभिमानी बनवणे, शैक्षणिक शाखांचे विस्तारीकरण करून अनेकांना शिक्षणाच्या संधी निर्माण करणे.

सन १९५४ मध्ये त्यांनी सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू केले. त्यानंतर लगेचच कऱ्हाड येथे संत गाडगेबाबा कॉलेज सुरू केले. सन १९५५ मध्ये चांगले शिक्षक घडवण्याच्या उद्देशाने, मौलाना आझाद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरू केले. त्यांचा प्रमुख उद्देश शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करून सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्याचा होता. या सर्व कार्यात महात्मा फुलेंचा त्यांच्या मनावर जबरदस्त पगडा होता. भाऊराव पाटील यांनी सर्व जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी ३८ वसतिगृहे असलेल्या शाळा आणि हायस्कूल सुरू केली, तसेच ५७८ शाळा, सहा ट्रेनिंग कॉलेज, १०८ हायस्कूल आणि तीन महाविद्यालये सुरू केली. महाराष्ट्रातील लोकांनी त्यांना कर्मवीर' ही पदवी दिली. कृतिशील राजा असाच त्याचा अर्थ आहे. रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील फार मोठी शिक्षण संस्था त्यांनी निर्माण केली.

सन १९५९ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांना पुणे विद्यापीठाने डी.लिट. पदवी देऊन सन्मानित केले. त्याचवर्षी भारत सरकारने पद्मभूषण देऊन त्यांना सन्मानित केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अनेकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवन प्रकाशमय केले. कर्मवीर भाऊराव पाटील ९ मे १९५९ रोजी त्यांचे निधन झाले. ग्रामीण भागातील शैक्षणिक कार्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य कायम आठवणीत राहणारे आहे. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान



### आता एक्सवरही होणार स्टोरी शेअर; जाणून घ्या फिचर

चॅट जीपीटी आणि बार्डसारख्या एआय चॅटबॉट्सशी स्पर्धा करण्यासाठी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये एलॉन मस्कने स्वतःचा एआय चॅटबॉट जगासमोर आणला. त्यांनी स्वतःची आर्टिफिशियल इंटेलिजन्स कंपनी एक्सएआय तयार केली आहे आणि एआय चॅटबॉटला ग्रोक असे नाव दिले.



एक्स (ट्विटर) एक्स प्रीमियम व प्रीमियम प्लस वापरकर्त्यांद्वारे या चॅटबॉटमध्ये प्रवेश केला जाऊ शकतो, तर युजर्ससाठी एक खास बातमी समोर येत आहे. इन्स्टाग्राम ॲप 'स्टोरी' या फीचरसाठी खूप जास्त प्रसिद्ध आहे. त्यातच आता नवीन 'रिव्हील' फीचरदेखील जोडण्यात आले आहे. त्यामुळे आता ट्विटर (एक्स)ने त्यांच्या नवीन फीचर 'स्टोरीज'ला एआय जोडण्याचे ठरविले आहे.

इन्स्टाग्राम स्टोरी फीचर आणि एक्स (ट्विटर)चे स्टोरी फीचर खूप वेगळे असणार आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, स्नॅपचॅटवर युजर्स त्यांच्या पसंतीनुसार क्रमवार स्टोरीवर फोटो, व्हिडीओ, मजकूर शेअर करतात, पण एलॉन मस्कचे स्टोरी फीचर ट्विटर (एक्स) एक्सप्लोर विभागातील वैयक्तिक ट्रेंडिंग गोष्टींचा सारांश देण्यासाठी ग्रोक एआय चॅटबॉट जोडणार आहे. म्हणजेच एआयची मदत घेऊन हा सारांश स्टोरीमध्ये रूपांतरित होणार आहे.

एक्स (ट्विटर) इंजिनियरिंग टीमने पोस्ट केलेल्या स्क्रीनशॉटनुसार 'स्टोरीज' हे फीचर युजर्सच्या ट्विटवर आधारित सारांश तयार करील. पारंपरिक बातम्यांच्या लेखांवर आधारित नाही . त्याउलट एक्स (ट्विटर)वरील 'स्टोरीज' युजर्सच्या आवडीनुसार बातम्यांच्या स्वरूपात पेजवर प्रदर्शित केल्या जातील, अशी घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक आणि इतर वरील स्टोरी २४ तासांनंतर दिसत नाहीत. पण, एक्स (ट्विटर)चे स्टोरीज फीचर या प्रकरणात वेगळे असू शकते.

एक्स (ट्विटर)च्या ग्रोक एआय चॅटबॉट ग्रोकमध्ये प्रवेश करण्यासाठी युजर्सना प्रीमियम सबस्क्रिप्शन खरेदी करावे लागेल. प्रीमियम आणि टॉप-टियर प्रीमियम+ प्लॅन असलेल्या युजर्सना पच्या खालच्या मध्यभागी बटणावर टॅप करून ग्रोकमध्ये प्रवेश मिळविण्याची परवानगी दिली जाईल. तर अशा प्रकारे युजर्स या स्टोरी फीचरचा तसेच एक्स (ट्विटर)चा आनंद घेऊ शकणार आहेत.

# समाजसुधारक गोपाळ कृष्ण गोखले



**निमित्त**

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक गोपाळ कृष्ण गोखले हे आधुनिक भारताचे एक महान नेते, नेमस्त पक्षाचे अध्वर्यु आणि थोर समाजसेवक होते. यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यात कोतळूक येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कृष्ण महादेव गोखले आणि आईचे नाव सत्यभामाबाई कृष्ण गोखले होते. त्यांचे वडील शेतकरी होते.

गोपाळ गोखले यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे गेले. इथेच त्यांचे प्राथमिक शिक्षणदेखील झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वडिलबंधूं गोविंदराव यांनी स्वतःचे शिक्षण सोडून पत्नीचे दागिने विकून गोपाळ कृष्ण गोखले ह्यांना उच्चशिक्षणास कोल्हापुरातील राजाराम कॉलेज आणि मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजात पाठविले. १८८४मध्ये गणित विषयात बीएची पदवी मिळवून जानेवारी १८८५मध्ये पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नौकरी स्वीकारली. नंतर पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व, फर्ग्युसन कॉलेजात अध्यापन, १८९५मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून नियुक्त झाले. त्यांनी शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ या त्रासांचा सखोल अभ्यास करून सरकारकडे निवेदन पाठविले. १९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. हिंदुस्थानात राज्यकारभाराचा खर्च कसा वाढत आहे व त्यामुळे करवाढ कशी डोईजड होत आहे हे गोखले यांनी सप्रमाण दाखवून राजकीय सुधारणांची आवश्यकता प्रतिपादन केली.

गोखले पुण्यात न्यायमूर्ती रानडे यांच्या संपर्कात आले. ते रानडे यांच्या आर्थिक आणि राजकीय विचारांशी खूप प्रभावित झाले. न्यायमूर्ती रानडे एक महान देशभक्त आणि समाजसुधारक होते. गोपाळ गणेश आगरकर यांनी सुरू केलेल्या 'सुधारक'च्या इंग्रजी आवृत्तीची जबाबदारी नामदार गोखले यांनी सांभाळली. सार्वजनिक सभा, वृत्तपत्रातून ते लिखाणाद्वारे समाजसुधारणांचा पाठपुरवठा सतत करायचे. १९०२ साली मध्यवर्तीय कायदेमंडळावर निवड झाल्यावर ते नामदार झाले. त्यांनी अर्थसंकल्पांवर जे भाषण केले, त्यामुळे त्यांचे कर्तृत्व व नेतृत्व देशमान्य झाले. त्या विधिमंडळात त्यांनी अर्थसंकल्पावर १२ भाषणे केली. त्यातून तत्कालीन भारताच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक वगैरे प्रश्नांचा उत्कृष्ट ऊहापोह त्यांनी केला. भारताची शेती, शेतकर्यांच्या अडचणी, आयातनिर्यात, करभार, उद्योग, रुपयाचे पौंडाशी नाते, लष्करावरील खर्च असे अनेक विषय त्यांनी व्यासंगपूर्वक हाताळले. त्यांच्यातील क्षमतेला बघून व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो यांनी गोखले ह्यांना मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याचा मसुदा तयार करण्यास सांगितले. त्या दरम्यान त्यांनी पार्लमेंटच्या सदस्यांना भेटून भारतातील समस्या आणि त्याचे प्रश्न त्यांच्या कानी घातले. ते भारतातील पहिल्या श्रेणीचे अर्थतज्ज्ञ होते. हे भारतामधील ब्रिटिश साम्राज्याविरोधात स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणारे राजकीय आणि सामाजिक नेता होते.

आपला साधा स्वभाव, बौद्धिक क्षमता आणि देशासाठी दीर्घकाळ निः स्वार्थ सेवा करण्यासाठी त्यांना नेहमी स्मरले जाईल. ते इंडिया पब्लिक सर्व्हिस सोसायटीचे संस्थापक आणि अध्यक्ष होते. ते उदारमतवादी विचारसरणीचे अग्रगण्य घटक होते. ते १९०५मध्ये स्वातंत्र्याच्या पक्षात लाला लाजपतराय यांच्यासह इंग्लंडला गेले आणि अतिशय प्रभावीपणे देशाच्या स्वतंत्रतेबद्दल बोलले. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी गोपाळ कृष्ण गोखले यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : समुद्राला भरती आल्याने गाढी नदीच्या पाणीपातळीतही वाढ झाल्याचे दिसून आले.** (छाया : संस्कृती पाटील)

## आरोग्य प्रहर

### उष्माघातापासून दूर राहण्यासाठी 'हे' करा!

आता उन्हाळ्यात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. अशात शरीराला पाण्याची कमतरता जाणवणे, स्ट्रोक, खूप जास्त घाम येणे, थकवा जाणवणे इत्यादी समस्यांचा त्रास होतो. अशात भरपूर पाणी पिणे, सुती कपडे घालणे आणि नीट योग्य तो पोषक आहार घेणे गरजेचे आहे. इन हाउस आयुर्वेदिक सल्लागार डॉ. अश्विनी कोन्नूर यांनी उन्हापासून संरक्षण करण्यासाठी काही प्रभावी मार्ग सांगितले आहेत.



आहाराकडे लक्ष द्या

तुम्ही जे काही खाता त्याचा थेट परिणाम तुमच्या ऊर्जेवर दिसून येतो. उन्हाळ्यात पचायला हलक्या असणाऱ्या अन्नाचा आहारात समावेश करणे कधीही चांगले असते. उष्ण वातावरणात शरीराची पचनक्रिया मंदावते. त्यामुळे शारीरिक क्रिया सुरळीत ठेवण्यासाठी हलका पोषक आहार घ्यावा. उदा. दही, पांढरा भात, सॅल्मन मासा तुम्ही खाऊ शकता. आंबट व तिखट पदार्थ खाणे टाळा.

भरपूर फळे आणि भाजीपाला खा

फळे आणि भाजीपाल्यामध्ये खूप जास्त प्रमाणात जीवनसत्त्वे, पोटॅशियम, फोलिक ॲसिड व मिनरल्स असतात. हे घटक शारीरिक क्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतात. त्यामध्ये चांगले फॅट्स असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात.

जास्तीत जास्त द्रव पदार्थांचे सेवन करा

उन्हाळ्यात जास्तीत जास्त द्रव पदार्थांचे सेवन करणे खूप गरजेचे आहे. द्रव पदार्थ आपल्या शरीरातील पाण्याची पातळी भरून काढतात आणि आपले शरीर थंड ठेवण्यास मदत करतात. उन्हाळ्यात अल्कोहोल घेणे टाळले पाहिजे. त्याऐवजी फळांचा रस, लिंबू पाणी, ताक, नारळ पाणी, ग्रीन टी हे द्रव पदार्थ सहज उपलब्ध असतात आणि त्याचे अनेक फायदेही दिसून येतात.

व्यायामामध्ये बदल करा

उन्हाळ्यात शरीरावर ताण पडणार नाही, याची काळजी घ्या आणि त्यानुसार व्यायामप्रकार निवडा. खूप जास्त तास व्यायाम करणे आणि खूप जास्त धावणे टाळा. त्याऐवजी प्राणायाम करा.

जीवनशैलीमध्ये बदल करा

उन्हाळ्यात रात्र लहान असते. त्यामुळे दिवसा तुम्ही थोडा आराम करू शकता. याशिवाय फिकट रंगाचे सुती कपडे, चंदन, फुलांपासून बनविलेले अत्तर यांचा वापर करा. घराबाहेर पडण्यापूर्वी किमान ५० एसपीएफ असलेले सनस्क्रीन वापरा. जर कडाक्याचे ऊन असेल, तर सनकोट तसेच छत्री वा टोपीचा वापर करा.

# सुक्या मासळीला स्थानिकांसह पर्यटकांची पसंती

### अगोटसाठी खरेदीची लगबग



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. १ जूनपासून दोन महिने पावसाळ्यात मासेमारी बंद असते. पावसाळ्यातील बेगमीसाठी सुकी मासळी हक्काचे जिन्नस आहे. त्यामुळेच या दिवसांत सुकी मासळी खरेदी व साठवण करण्याची अनेक जणांची लगबग सुरू आहे. मागील महिन्याच्या तुलनेत आता सुक्या मासळीचे दर किलो मागे ५० ते १०० रुपयांनी कमी झाले आहेत. परिणामी खवय्ये सुकी मासळी खरेदीची घाई करीत आहेत.

सध्या जिल्ह्यातील आठवडा बाजार व मासळी बाजारात सुकी मासळी खरेदीसाठी रेलचेल सुरू आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यांत भाजीपाला व मासळीची आवक कमी होते आणि त्यांचे दरदेखील वधारतात. अशा वेळी घरात साठवून ठेवलेली सुकी मासळी काढली की, मग जेवण चांगले जाते. मागील वर्षभरात समुद्रात अगदी कमी प्रमाणात मासळी सापडत आहे. सापडलेली मासळी ताजी विकण्यावर मच्छिमारांचा कल असतो. मासळी आधीच कमी मग सुकविण्यासाठी कुठून उरणार त्यामुळे मासळी फार कमी जण सुकवितात, मात्र तरीही हे सुकी मासळी पुरेशी असल्याने जिल्ह्यासह पुणे, मुंबई या शहरातील पर्यटक व नागरिक आवर्जून येथून खरेदी करून घेऊन जातात.

### पेडली सुक्या मासळीचे हब

***पाली-खोपोली राज्य महामार्गावर पेडली या गावी सुकी मासळी विक्रेते केंद्रित झाले आहेत. सध्या या ठिकाणी सुक्या मासळीची सात दुकाने आहेत. त्याचबरोबर या मार्गावर चिवे येथे देखील सुकी मासळी विक्रेते बसतात. त्यामुळे पुणे व मुंबईकडे जाणारे प्रवासी व पर्यटक आवर्जून या ठिकाणी थांबून चांगल्या दर्जाची सुकी मासळी खरेदी करतात. त्यामुळे पेडली हे सुक्या मासळीचे हब झाले आहे.***

“ पावसाळ्यात खाण्यासाठी सुकी मासळी साठवून ठेवते. त्यामुळे दरवर्षी या दिवसांत सुकी मासळी खरेदी करते. घरच्या मंडळींना जेवणात मासे, मटण नसले तर सुकी मासळी आवर्जून लागते. त्यामुळे सुकी मासळी खरेदी केली आहे. पेडली येथे चांगल्या दर्जाची सुकी मासळी मिळते.

–**छाया म्हात्रे**, गृहिणी, पाली

“ मागील महिन्याच्या तुलनेत आता सुक्या मासळीचे दर कमी झाले आहेत. पावसाळ्यातील बेगमीसाठी खवय्ये आवर्जून सुकी मासळी खरेदी करतात. पुणे, मुंबईकडे जाणारे प्रवासी व पर्यटक तसेच स्थानिक नागरिकही खरेदी करतात. किमती कमी झाल्यामुळे अधिक खरेदी करीत आहेत. ग्राहकांना उत्तम दर्जाची सुकी मासळी योग्य दरात पुरवतो.

–**सुनील सावंत**, सुकी मासळी विक्रेता


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE, KHARGHAR

**Plot No: 1, Sector-33, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai-410210**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full Time Asst. Professors for the Academic Year 2024-2025 Only on Purely Temporary basis for the following subjects**

| Sr. No | Post | Subject | Qualifications | Required Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Asst. Professor | HR Management | MBA/MMS in HR with NET/SET/Ph.D. | 03 |
| 2 | | Financial Management | MBA/MMS in Finance with NET/SET/Ph.D. | 01 |
| 3 | | Marketing Management | MBA/MMS in Marketing with NET/SET/Ph.D. | 01 |
| 4 | | Accounting & Finance | M. Com. with NET/SET/Ph.D. | 03 |
| 5 | | Commerce & Accountancy | M.Com. with NET/SET/Ph.D. | 03 |
| 6 | | Business Economics | M. A (Economics) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 7 | | Mathematics | M. Sc. (Mathematics) with NET/SET/Ph.D | 04 |
| 8 | | Information Technology | M.Sc. in IT/MCA/MCS with NET /SET/Ph.D. | 07 |
| 9 | | Computer Science | M. Sc. (Comp. Sci./ I. T./ MCA/ MCM) with NET /SET/Ph.D. | 04 |
| 10 | | Chemistry | M. Sc. (Chemistry) with NET/SET/Ph.D. | 04 |
| 11 | | Physics | M. Sc. (Physics) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 12 | | Botany | M. Sc. (Botany) with NET/ SET/Ph.D. | 01 |

- Applications with full details (Email address & Whatsapp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, at Ramsheth Thakur College of Commerce & Science, Kharghar. Plot No: 1, Sector-33, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai - 410210
- Candidates may submit the application by email to **principal@rtccs.edu.in** **or by post** on or before **31/05/2024**
- If required Contact - **Dr.Rupendra Gaikwad (Principal) - 9423001141** **Mr. Nitin Vaskar - 9821967877**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## CHANGU KANA THAKUR VIDYALAYA NEW PANVEL

**Plot No: 8, Sector -14, New Panvel, Tal- Panvel, Dist- Raigad, Navi Mumbai - 410206.**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2024-2025 Only**

Full Time Asst. Teachers on Purely Temporary basis for the following subjects

| Sr. No | Name of the Branch | Section | Post / Section | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Changu Kana Thakur Vidyalaya, English Medium New Panvel | Pre-Primary | Asst. Teacher | B.A,/B.Com/B.Sc. with ECCED | 01 |
| | | Primary | Computer Teacher | Diploma in Computer Science with DTP/B.Sc, IT/ BCA | 01 |
| | | | Clerk | B.Com /M.Com with Tally ERP 9.0 and Proficiency in Computer Skill with 2/3 Year Experience | 02 |
| | | Secondary | Counselor | B.A., M.A. (Psychology) | 01 |
| | | | Computer Labroratory Assistant | Diploma in Computer Science with DTP/B.Sc, IT/ BCA | 01 |
| 2 | Changu Kana Thakur Higher Secondary Vidyalaya, New Panvel | Higher Secondary Section (Jr. College) | Asst. Teacher | M.A. B.Ed (English) | 01 |
| | | | Asst. Teacher | M.Sc. B.Ed. (Mathematics) | 02 |
| | | | Asst. Teacher | M.A. B.Ed (Geography) (English Medium) | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P.Sanstha, Plot No.08, Sector-14, New Panvel, Tal- Panvel,Dist- Raigad - 410206.
- Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** **or by post** on or before **31/05/2024**
- If required Contact - **Mr. Balkrushna Patil- 8108585055** **Mrs. Saylee patankar - 9930718675**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (AUTONOMOUS)

**Plot No: 1, Sector -11, Khanda Colony, New Panvel (W) Tal- Panvel. Dist- Raigad - 410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full Time Asst. Professors for the Academic Year 2024-2025 Only on Purely Temporary basis for the following subjects**

| Sr. No | Subject | Post | Qualifications | Required Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | Mathematics | Asst. Professor | M. Sc. (Mathematics) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 2 | Biotechnology | | M.Sc. (Biotechnology) with NET /SET/Ph.D. | 01 |
| 3 | Computer Science & Accounting Finance | | M. Sc. (Comp. Sci./ Information Technology MCA/ MCM) with NET /SET/Ph.D. | 05 |
| 4 | BMS | | MMS/ MBA (Finance & Marketing) with NET\ SET\Ph.D. | 02 |
| 5 | Commerce | | M.Com with NET/ SET/Ph.D. | 03 |
| 6 | Accountancy | | M.Com (Accountancy) with NET/SET/Ph.D. | 02 |
| 7 | Hindi | | M. A. (Hindi) with NET/ SET/Ph.D. | 01 |
| 8 | Fashion Design | | B. Sc./ M.Sc in Fashion Design | 03 |
| 9 | Interior Design | | M.Arch,B.Arch, M. Sc./ B.Sc/ B. Voc. in Interior Design | 01 |
| 10 | NSS | | M.A. (Social Science/Political Science/Eco.) with SET/NET/ Ph.D. | 01 |
| 11 | Geography | | M. A. (Geography) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 12 | Marathi | | M. A. (Marathi) with NET/SET/Ph.D. | 01-CHB |
| 13 | Buss. Economics | | M. A. (Buss. Economics) with NET/SET/Ph.D. | 01-CHB |

- Applications with full details (Email address & Whatsapp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, Changu Kana Thakur Arts, Commerce &Science College, New Panvel (Autonomous) Plot No.01,Sector-11, Khanda Colony, New Panvel, (W) - 410206.
- Candidates may submit the application by email to **principal@ckthakurcollege.net** **or by post** on or before **31/05/2024**
- If required Contact - **Mr. Pralhad Thakur - 9022600288**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## BHAGUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW, NEW PANVEL

**Plot No.4, Sector – 11, New Panvel (E), Dist.- Raigad, Pin-410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full Time Asst. Professors for the Academic Year 2024-2025 Only on Purely Temporary basis for the following subjects**

| Sr. No | Particulars | Post | Qualifications | Required Posts |
|---|---|---|---|---|
| 1 | UG Programme | Asst. Professors- In- LL.B | LL.M. NET/SET/ Ph.D | 06 (Full Time) |
| 2 | | Asst. Professors- In- B.A.LL.B | LL.M. NET/SET/ Ph.D | 02 (Full Time) |
| | | | 1) M.A.NET/SET/Ph.D in English<br>2) M.A.NET/SET /Ph.D in Political Science<br>3) M.A.NET/SET /Ph.D in Sociology<br>4) M.A.NET/SET/Ph.D in History<br>5) M.A.NET/SET/Ph.D in Economics<br>6) M.A.NET/SET/Ph.D in Philosophy | 02 Full Time (in Combinations of two/more specializations) OR CHB (in Single specialization) |
| 3 | PG Programme | Asst. Professors- In- LL.M | LL.M,NET\ SET\ Ph.D. | 06 (CHB Basis) |

- Applications with full details (Email address & Whatsapp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, at Bhagubai Changu Thakur College Of Law, New Panvel, Plot No: 04, Sector -11, New Panvel, - 410206
- Candidates may submit the applications by email to **bcthakurcollegeoflaw@gmail.com** **or by post** on or before **31/05/2024**
- If required Contact - **Mrs.Sanavi Deshmukh (Principal) - 98929974791** **Mr. Ujwal Patil - (Clerk) - 9004401961**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## SMT.BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI

**Plot No: 60/61, Sector-12, Tal: Uran, Dist.: Raigad-400707**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2024-2025 (Self Finance School)**

Full Time Asst. Teachers on Purely Temporary basis for the following subjects

| Section | Post | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|
| Primary | Asst. Teacher | B. A, / B. Sc.D. Ed | 02 |
| All Section | Computer Teacher | Diploma in Computer Science with DTP/B.Sc, IT/ BCA | 01 |
| | Librarian | Graduate with B.LIB./M.LIB | 01 |
| | Physical Educator | B. A., B. P. Ed | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman,J.B.S.P.Sanstha, Plot No : 60/61, Sector-12, Dronagiri Node.Tal: Uran. Dist: Raigad-400707.
- Candidates may submit the application by email to **bctvidyalaya@gmail.com or by post** on or before **31/ 05/2024**
- If required Contact - **Mrs. Anuradha Kathe (I/C Head Mistress) - 9819212918** **Mrs. Snehal Patil - 9594964872**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE

**Proposed C.B.S.E. School**

**Plot No: 01, Sector-12,Ulwe,Tal-Panvel,Dist- Raigad-410206**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2024-2025 for immediate Joining**

| Section | Post | Educational Qualification | Vacant Post |
|---|---|---|---|
| Pre-Primary | Asst. Teacher | B. A./B. Com/B. Sc./with ECCED | 01 |
| All Section | Librarian | Graduate with B.LIB./M.LIB | 01 |
| | Music Teacher | Bachelor Degree in Music/ Sangit Visharad or equivalent from a recognized University | 01 |
| | Nurse | ANM/ GNM/B.Sc. Nursing | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P.Sanstha, Plot No: 01, Sector-12, Ulwe,Tal-Panvel, Dist- Raigad, Navi Mumbai. 410206.
- Candidates may submit the application by email to **rtpsulwe@gmail.com** or by poston or before **31/05/2024**
- If required Contact - **Mr. Mahendra Katkar - (I/C Principal) 9503121113** **Mrs. Sonal Mokal - 7045299876**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

# मोरबे धरणात मर्यादित जलसाठा

## नवी मुंबईकरांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई, ठाणेसह आजूबाजूच्या शहरांवर पाणीकपातीचे संकट असताना दुसरीकडे नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणात मात्र पुढील ८० दिवस पुरेल एवढा जलसाठा आहे, परंतू नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा व पाणी जपून वापरावे असे आवाहन महापालिकेने केले आहे.



राज्यातील विविध धरणांत झपाट्याने पाणीसाठा कमी होत असून मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांत फक्त ४० टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा शिल्लक असताना नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात सध्या ३६.६२ टक्के जलसाठा आहे. नवी मुंबईकरांना पुढील ८० दिवस पुरेल इतका जलसाठा धरणात आहे.

राज्याच्या विविध भागांत तसेच मुंबई शहरावरही पाणीकपातीचे संकट असताना नवी मुंबईकरांना मात्र २६ जुलैपर्यंत सुरळीत पाणीपुरवठा करता येईल एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. तरीदेखील नवी मुंबईकरांनी पाण्याचा वापर जपून करायला हवा.

लोकसंख्यावाढ पाहता नवी मुंबई महापालिकेने भिरा कुंडलिका प्रकल्पातील तसेच नवीन जलस्त्रोत निर्माण करण्याचेही नियोजन केले आहे. महापालिकेला एमआयडीसीकडून हक्काचे ८० एमएलडी पाणी मिळत नसून फक्त ७० एमएलडीपर्यंत मिळत आहे. पालिका प्रशासनाने प्रतिमाणसी फक्त २०० लिटरप्रमाणे नियोजन करणे आवश्यक आहे.

> **मोरबे धरणातून पावसाळ्यापर्यंत सुव्यवस्थित पाणीपुरवठा होईल याबाबत योग्य ती काळजी घेण्यात येत असून नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा.**
> **–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नमुंमपा**

# तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




कोपरखैरणेत एका तरुणीने आत्महत्या केल्याची घटना डिसेंबर महिन्यात घडली होती, मात्र तिच्या परिचित युवकाने दिलेल्या मानसिक त्रासामुळे तिने आत्महत्या केली असा दावा तिच्या पालकांनी केला होता. याबाबत काही ठोस पुरावे सादर करूनही त्या युवकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला जात नव्हता. अखेर आयुक्तांपर्यंत प्रकरण गेल्यावर मात्र आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोन युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यश जाधव आणि हर्ष जाधव अशी यातील आरोपींची नावे आहेत.

कोपरखैरणे येथे राहणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणीला आत्महत्या करण्यास भाग पाडले म्हणून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित युवती ज्या इमारतीत राहत होती त्याच इमारतीत आरोपींचे मामा राजू धनावडे राहत होते. तर आरोपी उल्हासनगर येथे राहणारे असून धनावडे यांच्याकडे दोन्ही आरोपींचे नेहमी येणे-जाणे होते. त्यामुळे आरोपींची जुजबी ओळख पीडितेशी झाली होती. त्यातून आरोपी यश याचे युवतीवर एकतर्फी प्रेम होते. मात्र युवती शिक्षणाला महत्त्व देत शिकत होती.

दरम्यान, त्या युवकाने तिला मानसिक त्रास देणे सुरू केले. त्यात इन्स्टाग्रामवर शारीरिक सुखाची मागणी यश जाधव याने केली. या मानसिक धक्क्यातून ती सावरत नाही तोच तिच्या घराजवळ राहणाऱ्या हर्ष जाधव याने तिच्याशी भांडण उकरून काढले. या सर्व प्रकरणाने वैतागून युवतीने १ डिसेंबरला रात्री राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली.

पीडित युवतीने आरोपींच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली असे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी दिली.

# ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

ठाणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांची आमदार मंदा म्हात्रे यांच्या निवास्थानी संयुक्त बैठक झाली. या वेळी शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी देखील मार्गदर्शन केले की, सर्व कार्यकर्त्यांनी प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन नागरिकांशी सवांद साधण्याचे आवाहन केले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करा, उमेदवाराच्या विजयासाठी पुर्ण ताकतीने काम करा तसेच महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांना निवडून आणणे आपले ध्येय असल्याचे नाहटा म्हणाले.



आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, या वेळी उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान करण्यासाठी ही निवडणूक आहे. त्यासाठी चारसो पारचे उद्दिष्ट पूर्ण करायचे असेल तर महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे. तसेच भविष्यात या भागाचा सर्वांगीण विकास करायचा असेल आणि प्रगती साधायची असेल पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करायला हवे.

या वेळी सरोज पाटील, रोहिदास पाटील, विजय माने, दिलीप घोडेकर, विजय घाटे, जयाजी नाथ, दीपक पवार, जनार्दन सुतार, दत्ता घंगाळे, संजय ओबेरॉय, राजेश राय, दर्शन भारद्वाज, पांडुरंग आमले व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबईतील फेरीवाले मोकाट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी लोकसभा निवडणुकीत व्यस्त असल्याने शहरातील अनधिकृत बांधकाम करणारे भूमाफिया, फेरीवाले यांचे चांगलेच फावले आहे. नेरूळ रेल्वे स्टेशन, जुईनगर, सानपाडा रेल्वे स्टेशन, एपीएमसी मार्केट परिसर, वाशी सेक्टर १० १५ १६ आदी परिसरात फेरीवाल्यांनी उच्छाद मांडला आहे.

तुर्भे विभाग कार्यालयाअंतर्गत भाजी मार्केटच्या विरुद्ध बाजूकडील रस्ता ते धान्य मार्केटच्या आवक गेटपर्यंत २० ते २५ कांदे बटाटे विक्रेते चक्क रस्त्याची १ लेन (मार्गिका) हडप करून टेम्पोमध्ये मालाची विक्री करत आहेत. विशेष म्हणजे सकाळी ९ वाजल्या पासून पालिकेच्या अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, १० ते १५ सुरक्षा रक्षक यांच्या ताफ्यासह हजर असतात. तरीही हे रस्ता अडवून कांदे बटाटे विक्री करणारे टेम्पोवाले हटत नाहीत.

एपीएमसी सिग्नल ते माथाडी सिग्नल पर्यंतचे दोन्ही बाजूंचे पदपथ फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. या पदपथावर बसलेल्या फेरीवाल्यांकडून खरेदी करण्यासाठी जे लोक येतात ते तिथेच गाडी पार्क करत असल्याने अनेकदा वाहतूक कोंडी होत असते. एपीएमसी मार्केट मध्ये येणारे कामगार, खरेदीदार आदी पादचाऱ्यांना चालण्यास पदपथ नसल्याने जीव मुठीत धरून रस्त्यावरून चालावे लागत आहे. परिणामी अनेकदा किरकोळ आणि गंभीर स्वरूपाचे अपघात होत आहेत. यामुळे एपीएमसी वाहतूक पोलीस विभागाकडून अनेकदा थेट फेरीवाल्यांवर वाहतूक पोलिसांकडून कलम १०२ अन्वये गुन्हे देखील नोंद करण्यात आले आहेत. तसेच स्वतः वाहतूक पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी अनेकदा त्यांच्या पथकासह या फेरीवाल्यांना हुसकावून लावण्याचे कामदेखील केले आहे.

वाशी सेक्टर ९ पोलीस चौकी ते जुहू गाव सेक्टर ११ पर्यंतचा पदपथ पूर्णपणे फेरीवाल्यांनी व्यापलेला असतो. त्यामुळे या ठिकाणाहूनही पादचाऱ्यांना जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. सानपाडा सेक्टर ३/४ परिसरातील स्टेशन लगतच्या रस्त्यावर आणि पदपथावर फेरीवाल्यांनी सायंकाळच्या वेळेस बस्ताना मांडलेले असते. त्यामुळे या ठिकाणी वाहतुकीस होणारा अडथळा ही नित्याची बाब झाली आहे.

# शिर्डी येथे गरजूंना कपडे वाटप

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था या सामाजिक संस्थेतर्फे नेहमी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. सध्याचे गोर गरिबांची आर्थिक परिस्थिती व संस्थेचे योगदान लक्षात घेता गोर गरिबांना मदत करावे या अनुषंगाने शिर्डी येथील गरजू नागरिकांना शर्ट तसेच साड्यांचे चे वाटप करण्यात आले.

या वेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, खजिनदार सुरज पवार, संपर्क प्रमुख सादिक शेख, सामाजिक कार्यकर्ते महेश पाटील, शिर्डी येथील जेष्ठ पत्रकार राजेंद्र दिनबुळे, सदस्य रवि म्हात्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते. गरजू नागरिकांना कपडे मिळाल्याने आनंद व्यक्त करत नागरिकांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे आभार मानले.



# एचओसी स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

१९९९ साली म्हणजेच जवळपास २५ वर्षांपूर्वी दहावीपर्यंतचे शिक्षण घेतलेल्या एच.ओ.सी. स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी ८९ विद्यार्थी, २३ शिक्षक आणि दोन शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. सकाळी ९ वाजता शाळेतील माजी विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र आल्यावर सर्वांचे शब्द सुमनाने स्वागत करण्यात आले. त्यानंतर शिक्षकांनी त्यांच्या हस्ते गणेश पूजन आणि दीप प्रज्वलन केले. रसायनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बांगर साहेबांनी नारळ वाढवून कार्यक्रमाचा श्री गणेशा केला.




सर्व शिक्षकांना स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले. आपल्या विद्यार्थ्यांची गगनभरारी पाहून उपस्थित शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने आपला परिचय करून दिला. त्यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

अनेक विद्यार्थी खूप दुरून स्नेह भेटीच्या निमित्ताने एकत्र आले होते. या वेळी माजी विद्यार्थ्यांच्या गाण्यांचा व एकपात्री प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना २५ वर्षे पूर्ण असे स्मृतिचिन्ह आणि टोपी आठवण भेट म्हणून देण्यात आली.

स्नेहभेटीचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यामागे आयोजक प्रदीप गाताडे, पंकज शेळके, अमित पवार, सुजित धुरव, रूपेश दराडे, अनिल जांभळे, स्वप्निल रसाळ, सरिता म्हसकर, शीतल अंचवले, प्रीती होनावळे, मीना शेळके, प्रणाली चितळे, कामिनी पाटील यांनी पुढाकार घेतला.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी आणि शाळेने जे सहकार्य केले. त्याबद्दल पिल्लाई एचओसी इंटरनॅशनल स्कूल या शाळेच्या मुख्याध्यापिका लता मॅडम यांचे आभार. सर्व शिक्षक वृंद, सर्व माजी विद्यार्थी आणि कार्यक्रम संपन्न करणाऱ्या संपूर्ण आयोजक टीमचे आभार मानण्यात आले.

# ऐन उन्हाळ्यात आवक घटल्याने शहाळ्यांच्या किमतीत वाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढत्या उन्हाळ्यात शरीरातील झपाट्याने कमी होत जाणारी पाण्याची पातळी स्थिर ठेवण्यासाठी लोक पाण्यासोबतच विविध शीतपेये, सरबतांचा आधार घेत असतात. त्यातही उन्हाळ्यात नैसर्गिक आणि कोणतेही दुष्परिणाम नसलेल्या शहाळ्यांच्या पाण्याला अधिक पसंती दिली जाते, मात्र आता बाजारात शहाळ्यांची आवक घटल्याने किमतीत वाढ झाली आहे.


शहाळ्याचे पाणी आरोग्यासाठी गुणकारी असून त्यात अँटीऑक्सिडेन्ट मोठ्या प्रमाणात असतात. शहाळ्याचे पाणी शरीरातील पाण्याचे प्रमाण स्थिर ठेवण्यास मदत करते. शिवाय शरीरातील अपायकारक घटक काढून शरीर शुद्धीकरणसाठीदेखील मदत करते. शरीराला पोषक घटक



शहाळ्याच्या पाण्यात असल्याने उन्हाळ्यात कृत्रिम शीतपेयांपेक्षा नागरिक शहाळ्याच्या पाण्याला पसंती देताना दिसतात. त्यामुळे उन्हाळ्याच्या काळात रेल्वेस्थानके, बाजारपेठा, व्यावसायिक कार्यालये या भागात शहाळे विक्रेते दृष्टीस पडत असतात.

हवामान बदलाचा फटका जरी शहाळ्यांच्या आवकीवर बसला असला तरी ही आवक लवकर सुरळीत होईल, असे नवी मुंबईतील नारळ विक्रेते व्यंकटेश कुट्टी यांनी सांगितले.

# गाण्याच्या माध्यमातून तणावमुक्तीबाबत संदेश




**पनवेल : वार्ताहर**

सध्याची तरुणाई अनेकविध कारणांमुळे डिप्रेशन मध्ये जात आहे. तणावमुक्त राहायचे असेल, मनशांती हवी असेल तर घराच्या बाहेर पडा, स्वतःसाठी वेळ द्या, खूप प्रवास करा व आयुष्याचा आनंद घ्या असा संदेश मुसाफिर तू या इंडी पॉप ट्रॅव्हल म्युझिक व्हिडिओच्या माध्यमातून पनवेलच्या तरुणांनी दिला आहे.

मुसाफिर तू हे गाणे पनवेलच्या रोहित दर्जी यांनी लिहिले असून ते संगीतबद्ध करून त्यांनीच गायले आहे आहे. तर ट्रॅव्हलर प्रसन्न घाग यांनी व्हिडीओ शूट केले आहे. या गाण्याचे शूटिंग करण्यासाठी त्यांनी तब्बल ७०० किलोमीटर हुन अधिक प्रवास केला आहे. त्यांनी नाशिकमधील भंडारदरा, शेंडी, रतनगड, सिन्नर, घोटी, त्रिंबक व अश्या अनेक ठिकाणांचा यात समावेश आहे. त्यांनी हा संपूर्ण रोमांचक प्रवास रोडट्रीपच्या माध्यमातून बाइक रायडींग करून पूर्ण केला आहे. हे गाणे युट्युबसह इतर सर्व डिजिटल म्युझिक स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म वर उपलब्ध आहे.

सध्याच्या युवा पिढीची परिस्थिती पाहता त्यांनी या आगळ्यावेगळ्या विषयावर लक्ष केंद्रित करून तणावमुक्त राहण्यासाठी प्रवास करा, आठवणी बनवा व आयुष्याचा आनंद घ्या हा संदेश या व्हिडिओच्या माध्यमातून दिला आहे.

# अपोलो-केनियाटा युनिव्हर्सिटीचा करार

**नवी मुंबई : बातमीदार**

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई आणि केनियाटा युनिव्हर्सिटी टीचिंग, रेफरल अँड रिसर्च हॉस्पिटल (केयूटीआरआरएच) यांनी केनियामधील आरोग्य सेवेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या ऐतिहासिक निर्णय घेतला. दोन आघाडीच्या संस्थांनी वैद्यकीय कार्यक्रम, वैज्ञानिक संशोधन आणि शैक्षणिक उपक्रमांना संयुक्तपणे पुढे नेण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) केला.

वैद्यकीय पद्धतींमध्ये उत्कृष्ट प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे केयूटीआरआरएच च्या वैद्यकीय आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची क्षमता वाढवणे आणि अत्याधुनिक कौशल्यांसह त्यांना सक्षम करणे हे या भागीदारीचे प्राथमिक लक्ष होते.अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात केनियाटा युनिव्हर्सिटी टीचिंग, रेफरल अँड रिसर्च हॉस्पिटलमधील सहा वैद्यकीय व्यावसायिकांच्या टीमने मूत्रपिंड निकामी होण्याच्या व्यवस्थापनाचे सखोल प्रशिक्षण घेतले.

मूत्रपिंड प्रत्यारोपणाचे प्रशिक्षण युरोलॉजी, यूरो-ऑन्कॉलॉजी, मूत्रपिंड प्रत्यारोपण आणि रोबोटिक शस्त्रक्रियेचे वरिष्ठ सल्लागार डॉ. अमोलकुमार पाटील आणि नेफ्रोलॉजीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. रवींद्र निकाळजी यांनी केले.

# नवनिर्माण रिक्षा चालक-मालक संघटनेतर्फे पूजा

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील गणपती चौक येथील नवनिर्माण रिक्षा चालक मालक संघटना वतीने नुकतीच श्री सत्यनारायण पूजा झाली. वर्ष पहिले होते. पूजेसाठी संतोष पाखुर्डे व निलम पाखुर्डे बसले होते. दर्शनासाठी आलेल्या भक्तांना प्रसाद देण्यात आला.



या वेळी नवनिर्माण रिक्षा चालक-मालक संघटनाचे संस्थापक संदेश ठाकूर, नवनिर्माण रिक्षा चालक-मालक संघटनाचे अध्यक्ष दिनेश हळदणकर, उपाध्यक्ष रमेश भोळे, सचिव नरेंद्र सावंत, खजिनदार इरफान शेख व पूजा कमिटी अध्यक्ष शांताराम म्हात्रे, उपाध्यक्ष विनोद नार्डेकर, सचिव यज्ञेश ठक्कर, खजिनदार संदीप कुबल, यज्ञेश ठक्कर, यज्ञेश ठक्कर व सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

# नवी मुंबईत आरटीओची नऊ हजार ३७३ वाहनांवर कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दिवसेंदिवस वाढत्या अपघातांची संख्या याचे मुख्य कारण म्हणजे वाहन चालवताना वाहतुकीचे नियम डावलून वाहने चालवली जातात. नवी मुंबई शहरातही वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने अपघातांचे प्रमाण वाढत आहे. हे अपघात कमी करण्यासाठी वाशी आरटीओ विभागाकडून रस्ता सुरक्षा अंतर्गत वाहतूक नियम न पाळणाऱ्या वाहनांवर एप्रिल २०२३ पासून ते मार्च २०२४ पर्यंत एकूण नऊ हजारांहून अधिक वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.



आरटीओच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत नेहमीच सुरक्षित प्रवास वाहतुकीचे धडे दिले जातात. हेल्मेट वापरणे, सीटबेल्ट लावणे, मोबाईलवर बोलत वाहन न चालविणे, डोन्ट ड्रिंक ॲण्ड ड्राइव्ह याविषयी जनजागृती किली जाते. सुरक्षित वाहतुकीचे नियम सांगितले जातात. तरीही वाहनचालक वाहतूक नियम पायदळी तुडवत बेशिस्तपणे वाहने चालवतात.

कित्येकदा दुचाकीस्वार विनाहेल्मेट प्रवास करतात. परिणामी अनवधानाने अपघाताला निमंत्रण दिले जाते आणि हेल्मेट नसल्यामुळे त्यांच्या जिवावर बेतते. त्याचबरोबर चारचाकी वाहनचालकदेखील सीटबेल्ट न वापरता बेफिकिरपणे वाहन चालवतात. शिवाय वाहन चालवताना मोबाइलवरदेखील बोलत असतात. त्यामुळे यादरम्यान नजर हटी दुर्घटना घटी अशा घटना घडतात.

अपघातांचे हे प्रमाण कमी करण्यासाठी वाशी आरटीओ विभागाने बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण नऊ हजार ३७३ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक कारवाई ही विनाहेल्मेट आणि योग्यता प्रमाणपत्र नसणाऱ्या वाहनचालकांवर करण्यात आली.

# साळाव पुलाचे काम संथ गतीने; वाहतुकीस अडथळा





**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव पुलाच्या दुरूस्तीचे काम संथगतीने सुरू असून काही ठिकाणी एकमार्ग ठेवण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. परिणामी पुलावर वाहतूक कोंडीस सामोरे जावे लागते.

अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती असलेले व मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आल्याने साळाव पुलावरून वाहनाची जा–ये मोठी रेलचेल नेहमीच असते. साळाव पुलाचे गेले दोन वर्षे दुरूस्तीचे काम सुरू आहे. गतवर्षी काही काम पूर्ण झाले होते. दरम्यान पावसाळा संपल्यानंतर सार्वजनिक बांधकाम खात्याने पुलाच्या दुरूस्तीच्या कामास सुरुवात केली.

साळाव पुलाचे गेले सहा महिने काम सुरू आहे, मात्र काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने पुलावरून अवजड वाहतूक पूर्णपणे बंदी ठेवली आहे, तसेच पुलावरून काम सुरू असलेल्या ठिकाणी एकमार्ग ठेवण्यात आला आहे. ऐन एप्रिल, मे महिन्यातील सुट्टीचे दिवस व मुरूड तालुक्यातील पर्यटनाचे आकर्षण यामुळे साळाव पुलावरून वाहतुकीत वाढ झाली आहे. पुलाच्या दुरूस्तीचे काम जेथे सुरू आहे तेथे एकमार्ग ठेवण्यात आला आहे. एकमार्ग असल्याने वाहने पास होताना वाहतूक कोंडीस समोरे जावे लागते. त्यामुळे साळाव पुलावरून वाहने थांबल्याने वाहनांची मोठी रांग दोन्ही बाजूस उभी असते. त्यामुळे या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी स्थानिकांसह पर्यटकांमधून होत आहे.

## वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून दोघांना मारहाण

**पेण** : वडिलोपार्जित जमिन मोजणीच्या वादातून पेणमध्ये फिर्यादी व त्यांच्या मुलास मारहाण झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी (रा. कृष्णाई बंगला, जवाहरनगर, पेण) व आरोपी (रा. हनुमानआळ, पेण) यांच्यात हमरापुर येथील वडिलोपार्जित जमिनीच्या मोजणीवरून शुक्रवारी वाद झाला. यानंतर फिर्यादी व त्यांचा मुलगा घरी परतत असताना आरोपीने येऊन त्याची कार फिर्यादीच्या दुचाकीसमोर उभी केली. त्यानंतर इतर आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हलवालदार बैकर हे करीत आहेत.


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**RAMSHETH THAKUR HIGHER SECONDARY VIDYALAYA, KHARGHAR**

**Plot No: 1, Sector -33, Kharghar. Tal- Panvel. Dist- Raigad. Navi Mumbai - 410210**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following posts for the Academic Year 2024-2025 Only (Self Finance)**

Full Time Asst. Teachers on Purely Temporary basis for the following subjects

| Sr. No | Section / Post | Subject | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|---|
| 1 | Higher Secondary Section (Asst. Teacher) | Chemistry | M.Sc. B.Ed. | 01 |
| 2 | | Physics | M.Sc. B.Ed. | 02 |
| 3 | | Biology | M.Sc. B.Ed. | 01 |
| 4 | | Mathematics | M.Sc. B.Ed. | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P.Sanstha, Ramsheth Thakur Higher Secondary Vidyalaya, Kharghar, Plot No: 1, Sector-33, Kharghar,Tal:Panvel. Dist:Raigad. Navi Mumbai-410210
- Candidates may submit the application by email to **principalrthsv@gmail.com. or by post** on or before **31/05/2024**
- If required Contact - **Mrs. Nisha Nair (I/C Principal)- 9987476532**
  **Mrs. Kalyani Mhatre - 9870115721**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**


# कर्जतच्या खांडसमध्ये कुपोषित बालकांसाठी पोषण केंद्र

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका आदिवासीबहुल तालुका असून या भागात काही वाड्यांमध्ये कुपोषित बालके आढळतात. दळणवळणाची सोय, गरिबी अशा अनेक कारणांमुळे मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते.

सध्या कर्जतमध्ये प्रकल्प पोषण कार्यरत आहे. या अंतर्गत कुपोषित मुलांच्या पालकांना समुपदेशन करून मुलांना कर्जत येथे एनआरसीमध्ये घेऊन येण्यास सांगतात.

काही पालक तयारही होतात मात्र तेथे जास्त दिवस ते राहत नाहीत. तशी त्यांची




मानसिक इच्छा नसते. त्यामुळे कुपोषित बालकांची परवड होते. त्यामुळे युनाइटेड वे मुंबई यांनी ग्लीलनेस हॉस्पिटलच्या सहकार्याने प्राथमिक आरोग्य केंद्र खांडस येथे पोषण केंद्राची उपलब्धता करून दिली आहे.

खांडसमधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुपोषित बालकांसाठी पोषण केंद्राच्या उद्घाटनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव, प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकिय अधिकारी डॉ. आरती माने, ग्लीलनेस हॉस्पिटलचे हेमंत गुप्ता, रश्मी सावंत, लय तावडे आदी उपस्थित होते.

# माणगाव नेत्र शिबिरात २२ रुग्णांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.८) मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी २२ रुग्णांची तपासणी करून चार रुग्णांवर पनवेल येथे नेऊन शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.



शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश पाटील, डॉ. क्षमा, प्रतिमा गावित, अक्षता पार्टे, समृद्धी जंगम, विश्वनाथ पाटील, सागर पाटील व त्यांचे सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना स्थानिक कारागिरांना करणार सक्षम –डॉ. नितीन गांधी



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेची अंमलबजावणी साठी पुढाकार घेण्यात आला आहे. सहाण एकदंत नगर येथे प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतील टेलर या चौथ्या बॅचचे उद्घाटन बुधवारी (दि.८) झाले.

सहा दिवसांच्या प्रशिक्षण वर्गांमध्ये प्रतिविद्यार्थी एकत्रित प्रोत्साहन भत्ता चार हजार रुपयांबरोबरच, मोफत प्रशिक्षण प्रमाणपत्र, प्रत्येकी १५ हजार रुपयांचे विश्वकर्मा किट अथवा व्हाउचर्स बरोबरच कौशल्य वृद्धी प्रशिक्षणासह पाच टक्के व्याजदराने तीन लाखांपर्यंतची टप्प्याटप्प्याने कर्ज सुविधा देखील प्रशिक्षाणार्थ्यांना उपलब्ध होणार आहे, अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली. जेएसएस रायगडच्या माध्यमातून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना स्थानिक कारागिरांना सक्षम करणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी योजनेचा फायदा घेऊन नावनोंदणी करावी असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी केले.

# कर्जतमध्ये गृहमतदानाची प्रक्रिया सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये निवडणूकीच्या अनुषंगाने ८५ वर्षे वयावरील मतदारांसह दिव्यांग मतदार तसेच अत्यावश्यक सेवेतील एकूण ३११ मतदारांसाठी गृहमतदानाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली.



भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्या मार्गदर्शनाखाली मावळ लोकसभा मतदारसंघा अंतर्गत असलेल्या पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड, पिंपरी या विधानसभा कार्यक्षेत्रात गृहमतदान प्रक्रिया सुरू झाली.

कर्जत विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षे वयावरील ५९ मतदार आणि ११ दिव्यांग मतदारांसह अत्यावश्यक सेवेतील तीन मतदार असे एकूण ७३ मतदार गृहमतदानासाठी प्रक्रिया राबविली जात असून कर्जत विधानसभा मतदार संघातील नगर परिषद हद्दीतील जयराम शिवराम गांगल यांनी आज वयाच्या १०१व्या वर्षी गृहमतदान केले. त्यांनी आत्तापर्यंत झालेल्या सर्वच निवडणुकांसाठी मतदान करून आपले कर्तव्य बजावले आहे.

# रायगडातील तरुणांनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि महाराष्ट्र इंडियन रेस्क्यू अकादमी यांचे संयुक्त विद्यमाने कोलाड येथे २३ एप्रिल ते ३ मे रोजी दहा दिवसीय बेसिक फ्लड रेस्क्यू कोर्स आणि पीबीएच प्रमाणपत्र निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणार्थींना आंतरराष्ट्रीय सागरी संघटना मान्यता प्राप्त प्रमाणपत्र देण्यात आले.

स्वयंसेवकांना विविध प्रकारचे रेस्क्यू ट्रेनिंगचे धडे, थेअरी व प्रात्यक्षिकाचे प्रशिक्षण देण्यात आले. वाढत्या समस्यांचे निवारण करणे ही





काळाची गरज बनली आहे. अशातच भविष्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन रायगड प्रमुख सागर पाठक व इंडियन रेस्क्यू अकॅडमी रोहा कोलाड यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणामध्ये नागरी संरक्षण दल, आपदा मित्र, पोलीस मित्र, एनसीसी कॅडेट, एनएसएस स्वयंसेवक, एसव्हीआरएसएस, रेस्कुअर, गिर्यारोहक आणि सामाजिक संस्थांमधील स्वयंसेवक उपस्थित होते.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन रायगड प्रमुख सागर पाठक साहेब, इंडियन रेस्क्यू अकॅडमी रोहा कोलाड, जनरल मॅनेजर अमोल जाधव, कॉर्डिनेटर राजेंद्र पाटील, मास्टर ट्रेनर देविदास पाटील, मास्टर ट्रेनर कोंडाला राव, राज भोई, विनय पारंगे, अनिकेत जाधव, शुभम जाधव, अमित खैरे, राज तांबे, रुचिका शिर्के, सुयोग शिंदे, अनुप देशमुख व कॅन्टीन मॅनेजर बाळकृष्ण शेलवले आदी प्रशिक्षकांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले.

## विविध रेस्क्यू पद्धतींचे प्रशिक्षण

*यात या प्रशिक्षणात प्रामुख्याने विविध गाठींचे प्रकार, प्रथमोपचार, सीपीआर, स्कुबा, असेंडिग–डिसेडिंग, बोट हॅन्डलिंग, बोट पॉडलिंग, रिव्हर क्रॉसिंग, पोहणे आदी अनेक नवीन रेस्क्यूच्या पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात आले.*


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**विषय – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अन्वये जमीन संपादन करणेबाबत.**

१. राज्य शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित क्षेत्राच्या उभारणीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ अन्वये सिडको महामंडळास "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून घोषित केले आहे. नवी मुंबई प्रकल्पाकरीता जमीन संपादनासाठी निश्चित केलेल्या २२.५ % विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत, नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिकारीतेत सिडको महामंडळाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अन्वये नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित जमिनींच्या संपादनाच्या नोटीसा सिडको संकेतस्थळ व दैनिक वर्तमानपत्रांमध्ये यापूर्वी प्रसिध्द केल्या आहेत.

२. याद्वारे नोटीस देण्यात येते की, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये नवी मुंबई प्रकल्पाअंतर्गत **मौजे–जासई, ता.उरण, जि. रायगड** येथील खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन संपादन करण्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र मुंबई विभाग, मुंबई क्र. **LAQ-C-(१) ३७१ दिनांक २५/०८/१९७२** मध्ये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई देण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा दि. ०१.०१.२०१४ पासून लागू झाला आहे. सदर अधिनियमातील कलम १०८ च्या उप–कलम (१) व (२) अन्वये राज्य शासनाच्या कायद्यान्वये किंवा धोरणान्वये संपादीत करावयाच्या जमीनीचा देय मोबदला व पुनर्वसनाचे लाभ हे सदर अधिनियमांच्या तरतुदीपेक्षा एकंदरीत जास्त देय असतील, तर संबंधित जमीनधारकाची राज्य शासनाच्या कायदा अथवा धोरणानुसार मोबदला व लाभ स्विकारण्यास संमती असेल, तर असा जास्तीचा मोबदला आणि पुनर्वसनाचे लाभ देय असलेल्या कायद्याच्या अथवा धोरणानुसार स्वीकारता येईल, अशी तरतूद आहे.

४. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई देण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये जमीनीच्या संपादनापोटी देय असलेल्या मोबदला व पुनर्वसनाच्या लाभापेक्षा जमीनधारकांना एकंदरीत जास्त लाभदायक तरतूदी देणारे धोरण राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवी मुंबई विकास प्रकल्पाकरीता लागू केले आहे आणि सदर जमीन संपादन प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) अन्वये राबविण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर धोरणानुसार जमीन संपादनासाठी जमीनधारकाची संमती असल्यास त्यांना जमिन संपादनाच्या एकूण देय मोबदल्यापोटी २२.५% विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंड वाटपाचे धोरण स्विकारले आहे.

५. राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये जमीन संपादनासाठी निश्चित केलेली नुकसान भरपाई व इतर लाभ जमीनधारकांना एकंदरीत फायदेशिर होत असतील व संबंधित भूधारकांनी सदर लाभ स्विकारल्यास अशा जमीनधारकांना भूमि संपादन अधिनियमान्वये वाढीव मोबदल्याबाबत कोणत्याही न्यायालयात अर्ज करण्याची मुभा राहणार नाही.

६. राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) नुसार जमीन संपादन प्रक्रीया राबवून जाहीर करण्यात येणाऱ्या अंतिम संमती निवाड्याप्रमाणे अंतिमत: सर्व घटकांसह जमीनधारकांना देय होणाऱ्या २.५ चटई निर्देशांकासहीत १०% विकसीत जमीन व १२.५% भूखंड वाटप योजनेनुसार पात्र असणाऱ्या जमीनधारकांना १.५ चटई निर्देशांकासहीत विकसीत जमीन अनुज्ञेय राहील. त्यानुसार बाधित जमीनधारकांस भूमि संपादनाच्या मोबदल्यात अनुज्ञेय व देय विकसीत जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :–

| अ.क्र. | तपशील | विकसित जमिनीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | नुकसान भरपाईच्या रोख रकमेऐवजी विकसित जमीन | १०% |
| २ | १२.५% भूखंड वाटप योजनेनुसार पात्र जमीनधारकांस विकसित जमीन | १२.५% |
| | एकूण मिळणारी विकसित जमीन २२.५% | २२.५% |

७. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) मधील तरतुदीनुसार व या अधिनियमाच्या कलम १५२ व ११६ नुसार मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या गावातील सर्व्हे नंबरनिहाय जमीनीबाबत मालक/कुळ व इतर हितसंबंधित व्यक्ती यांनी जमीन संपादनापोटी व उपरोक्त शासन निर्णयानुसार देय असणारा २२.५% विकसीत भूखंड मिळण्यास संमती असल्यास संमतीपत्रे किंवा हरकत असल्यास, ती लेखी स्वरूपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून/मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन) यांचे कार्यालय, १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर – ४००६१४ येथे सादर कराव्यात.

८. परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेले गावनिहाय सर्व्हे क्रमांकापैकी जे सर्व्हे क्रमांक पडताळणीच्या प्रक्रियेमध्ये CRZ व कांदळवन बाधित असल्याचे निदर्शनास येतील आणि ज्या सर्व्हे क्रमांकाच्या ७/१२ सदरी इतर अधिकार रकान्यात प्रचलित कायदयानुसार हस्तांतरणास बंदी अशी नोंद असेल, अशा सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीच्या संपादनाबाबत प्रकरणनिहाय गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

९. परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व्हे क्रमांकापैकी काही सर्व्हे क्रमांकाची जमीन यापूर्वी नवी मुंबई प्रकल्पाकरीता अथवा अन्य प्रकल्पाकरीता सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित झाल्याचे दिसून आल्यास अथवा अन्य प्रकल्पाच्या प्रस्तावित संपादनामध्ये समाविष्ट असल्याचे दिसून आल्यास, अशा सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीच्या संपादनाबाबत प्रकरणनिहाय गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

**परिशिष्ट**

**मौजे जासई, ता. उरण**

| अ.क्र. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| १ | ९४ | १ | ०–१३–४० |
| २ | ९४ | २ | ०–११–१० |

**(डॉ. जगन्नाथ म. विरकर)**
**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/०१२/२०२४–२५

# दिल्लीची घरच्या मैदानात बाजी

## राजस्थानवर २० धावांनी विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अरुण जेटली स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये मंगळवारी (दि.७) सामना खेळण्यात आला. दिल्लीचे घरचे मैदान असलेल्या या स्टेडियमवर मोठ्या धावा होतात, त्यानुसार हा सामनाही मोठ्या धावांचा झाला. ज्यात दिल्लीने २० धावांनी बाजी मारली.

राजस्थानसाठी संजू सॅमसनची वादग्रस्त विकेट टर्निंग पॉइंट ठरली. शाय होपने बाउंड्री लाईनजवळ त्याचा कॅच पकडला आणि दिल्लीलाही होप दिल्या. या सामन्यात सॅमसनने टॉस जिंकून दिल्लीला प्रथम बॅटिंगला बोलावले होते. दिल्लीकडून तुफान फॉर्ममध्ये असणाऱ्या जॅक फ्रेझर-मॅकगर्कने याही सामन्यात आक्रमण केले आणि तो अवघ्या २० चेंडूत ५० धावा करून बाद झाला. त्यानंतरही अभिषेक पोरेलनंही आक्रमक ६५ धावांची खेळी केली.



आर. अश्विनने तीन विकेट्स घेत दिल्लीच्या धावगतीला लगाम घालण्याचा प्रयत्न केला, परंतु शेवटी ट्रिस्टन स्टब्सने २० चेंडूत ४१ धावा फटकावल्या. त्यामुळे दिल्लीने २० ओव्हरमध्ये २२१ धावा उभ्या केल्या. त्यानंतर राजस्थानने पहिली विकेट पहिल्याच ओव्हरमध्ये जैस्वालच्या रुपात गमावली. त्यामुळे सॅमसनला पहिल्या ओव्हरमध्ये मैदानात उतरावे लागले. त्याने जॉस बटलर, रियान पराग आणि शुभमन दुबे यांच्याबरोबर चांगल्या भागीदारीही केल्या.

यादरम्यान त्याने आक्रमक खेळताना २८ चेंडूत अर्धशतक झळकावले होते आणि तो शतकाच्या दिशेने वाटचाल करीत होता. त्याच्या खेळामुळे त्यामुळे राजस्थानने १५ षटकांच्या आतच १५० धावांचा टप्पा गाठला, पण याचवेळी मुकेश कुमारने टाकलेल्या चौथ्या चेंडूवर सॅमसनने शॉट मारला आणि शाय होपने अगदी बाउंड्री लाईनच्या जवळ कॅच घेतला.

या कॅचचा निर्णय थर्ड अंपायरकडे सोपवण्यात आला. थर्ड अंपायरच्या मते तो कॅच योग्य होता, पण संजू सॅमसन अन् राजस्थान रॉयल्स संघ मात्र यावर अत्यंत निराश दिसले. त्यांच्या मते होपचा पाय बाउंड्री लाईनला लागला होता. त्यामुळे सॅमसन ४६ चेंडूत ८६ धावा करून माघरी परतला अन् नंतरच्या चार षटकांत राजस्थानने आणखी चार विकेट्स गमावल्या. त्यामुळे त्यांना २० ओव्हरमध्ये आठ बाद २०१ धावाच करता आल्या.

दरम्यान, दिल्लीच्या या विजयाने मात्र आता प्लेऑफची शर्यत मोठी रंगतदार झाली आहे. चार संघ १२ पॉइंट्सवर आहेत, त्यामुळे आता प्लेऑफसाठी मोठी चूरस आगामी सामन्यांमध्ये पहायला मिळणार आहे.

# पंचांशी वाद घातल्याप्रकरणी संजू सॅमसनला ठोठावला दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४मधील दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध राजस्थानच्या सामन्यानंतर बीसीसीआयने रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनवर मोठी कारवाई केली आहे. दिल्लीविरूद्धच्या या सामन्यात बाद झाल्यानंतर संजू सॅमसन पंचांशी वाद घालताना दिसला. त्याच्या विकेटनंतर मैदानात मोठा गदारोळही पहायला मिळाला. संजू सॅमसनच्या या वर्तनावर बीसीसीआयने कारवाई केली आहे.



दिल्ली कॅपिटल्सविरूद्धच्या सामन्यात संजू सॅमसनने आठ चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ८६ धावांची वादळी खेळी केली. संजू सॅमसन या खेळीदरम्यान चांगल्या फॉर्मात दिसत होता, जर संजू शेवटपर्यंत मैदानात राहिला असता तर त्याने राजस्थानला नक्कीच विजय मिळवून दिला असता, पण १६व्या षटकात तो झेलबाद झाला. मुकेश कुमारच्या चेंडूवर मोठा फटका मारला, जो सीमारेषेवर उभ्या असलेल्या शाई होपने टिपला आणि त्याला झेलबाद केले. हा झेल टिपताना होपचा पाय सीमारेषेला लागला आहे की नाही, हे तपासण्यासाठी मैदानावरील पंचांनीच तिसऱ्या पंचांकडे निर्णय पाठवला.

तिसऱ्या पंचांनी संजूला बाद घोषित केले, पण संजू काही मैदानाबाहेर जायला तयार नव्हता आणि बाद झाल्यानंतर तो पंचांशी वाद घालताना दिसला. त्यामुळे आता बीसीसीआयने पंचांच्या निर्णयाशी असहमती दाखवल्याबद्दल संजूवर मॅच फीच्या ३० टक्के दंड ठोठावला आहे.

बीसीसीआयने निवेदनात संजू सॅमसनला दंड ठोठावला असल्याचे म्हटले. या निवेदनात म्हटले आहे. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनला दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध आयपीएल २०२४च्या ५६व्या सामन्यादरम्यान आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे.

# एशियन बॉक्सिंगमध्ये सृष्टी साठेला रौप्य

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

कजाकिस्तान येथे झालेल्या आशियाई युवा बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये छत्रपती संभाजीनगरमधील स्टार बॉक्सर सृष्टी साठे हिने चमकदार कामगिरी केली. तिने अंतिम फेरीत ६३ किलो वजनी गटात उझबेकिस्तानच्या बॉक्सरशी झुंज देत रौप्यपदक जिंकले.

कजाकिस्तान येथे २७ एप्रिल ते ६ मे रोजी दरम्यान आशियायी युवा बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत सुरवातीपासून भारतीय खेळ प्राधिकरण (साई) येथील आंतरराष्ट्रीय स्टार खेळाडू सृष्टी साठे हिने आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर अंतिम फेरी गाठली. या स्पर्धेत तिने अनेक देशातील खेळाडूंना धूळ चाखत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. यात ६३ किलो वजन गटात झालेल्या अंतिम फेरीत उझबेकिस्तानच्या बॉक्सरशी झुंज देत रौप्यपदक पटकाविले.



यापूर्वी तिने रोहतक हरियाणा येथे झालेल्या ६३ वजन किलो गटात अखिल भारतीय चाचणी पहिला क्रमांक मिळवत या स्पर्धेसाठी पात्र ठरली. सृष्टी साठे हिने आतापर्यंत आपल्या कामगिरीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय ६६ पदके पटकाविले आहेत. यात एएसबीसी महिला ज्युनिअर बॉक्सिंग चॅम्पियनशिप (२०२३-कझाकिस्तान) सुवर्णपदक तर आयबीए महिला जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप (२०२३-आर्मेनिया) रौप्यपदक पटकाविले आहे. तिच्या या सुवर्ण कामगिरीमुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिला साई येथील कोच सन्नी घयलावत यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## हॉकी लीगमध्ये बंगाल आणि ओडिसा विजयी

**रांची** : येथे सुरू असलेल्या हॉकी इंडियाच्या महिलांच्या २०२४ हॉकी लीग फेज-१ टप्प्यातील विविध सामन्यात बंगाल आणि ओडिसा यांनी प्रतिस्पर्धांवर विजय नोंदविले.

सहाव्या दिवशी पहिल्या सामन्यात बंगालने मिझोरामचा १-० अशा गोलफरकाने निसटता पराभव केला. या सामन्यातील निर्णायक गोल १८व्या मिनिटाला बंगालच्या शिवानी कुमारीने केला. दुसऱ्या सामन्यात ओडिसाने महाराष्ट्राचे आव्हान संपुष्टात आणले. ओडिसातर्फे दिपी मोनिका टोपोने २३व्या मिनिटाला तर करूणा मिंझने ५५व्या मिनिटाला गोल केले. महाराष्ट्रातर्फे ५१व्या मिनिटाला सुनीता कुमारीने केला.

# जीएम प्रीमियर लीगमध्ये जीएम लिटिल स्टार, रॉयल संघ, जीएम टायगर विजेता

**पनवेल : वार्ताहर**

डोंबिवलीमधील जीएम क्रिकेट अकॅडमीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे जीएम प्रीमियर लीग क्रिकेट सामने खेळले गेले. १० वर्षे वयोगटातील मुलांमध्ये जीएम लिटिल स्टार, १२ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये रॉयल संघ तर १४ वर्षांच्या मुलांमध्ये जीएम टायगर संघ विजयी ठरले.

या जीएमपीएल क्रिकेट सामन्याचे सहावे वर्ष आहे. गेले आठवडाभर हे सामने बघायला मिळाले. यामध्ये १० वर्षे वयोगटात जीएम लिटिल बॉईज व जीएम लिटिल स्टार हे दोन संघ अंतिम फेरीमध्ये पोहोचले व अखेर जीएम लिटिल स्टार हा संघ विजेता ठरला, तर १२ वर्षे वयोगटात जीएम इंडियन व जीएम रॉयल्स हे दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहचले. या दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत बघायला मिळाली.



यामध्ये जीएम रॉयल संघ विजेता ठरला. १४ वर्षे मुलांमध्ये जीएम टायगर व जीएम पँथर हे संघ अंतिम फेरीत पोहोचले या दोन्ही संघांमध्ये जीएम टायगर हा संघ विजेता ठरला.

# राजस्थानच्या पराभवाने आरसीबीला धाकधूक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४मधील ५६व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सला दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवाने राजस्थान संघाला फारसा फरक पडला नाही कारण राजस्थान रॉयल्स संघ १६ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि प्लेऑफसाठी पात्र ठरण्यासाठी त्यांना फक्त एका विजयाची गरज आहे, मात्र राजस्थानच्या या पराभवामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे मोठे नुकसान होऊ शकते. राजस्थानविरुद्धचा सामना जिंकून दिल्लीने १२ गुणांची कमाई केली, जी आरसीबीसाठी धोक्याची घंटा आहे.





राजस्थान रॉयल्सविरुद्धचा दिल्ली कॅपिटल्सचा पराभव रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघासाठी फायदेशीर ठरू शकला असता, पण तसे झाले नाही. आता इथून कोलकाता नाईट रायडर्स, राजस्थान रॉयल्स आणि पॉईंट टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या चेन्नई सुपर किंग्जला आपापले सामने जिंकावे लागतील, ज्यामुळे आरसीबीसाठी प्लेऑफचा मार्ग मोकळा होईल.

या अव्वल तीन संघांच्या विजयाव्यतिरिक्त, आरसीबीला आशा करावी लागेल की, त्याच्या खालचा कोणताही संघ १४ गुणांच्या पुढे जाऊ नये, ज्यात सनरायझर्स हैदराबाद, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांचा समावेश आहे. हैदराबाद, दिल्ली आणि लखनऊ या तीन संघांचे प्रत्येकी १२ गुण आहेत.

अशा स्थितीत तिन्ही संघांना उर्वरित सामन्यांमध्ये प्रत्येकी १-१ पेक्षा जास्त विजय नोंदवता येऊ नये. हैदराबाद आणि लखनऊला अद्याप प्रत्येकी तीन आणि दिल्लीला दोन सामने खेळायचे आहेत.

## बचावपटू संदेश झिंगन दुखापतीमुळे बाहेर

**नवी दिल्ली** : फिफा विश्वकरंडक (२०२६) पात्रता फेरीसाठी भारतीय फुटबॉल संघातील संभाव्य खेळाडूंच्या नावांची घोषणा करण्यात आली. अनुभवी बचावपटू संदेश झिंगन याची दुखापतीमुळे संघात निवड करण्यात आलेली नाही.

राष्ट्रीय शिबिरासाठी भारतातील एकूण ४१ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. १० मेपासून सुरू होत असलेल्या शिबिरात २६ खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. १५ मेपासून सुरू असलेल्या शिबिरासाठी १५ खेळाडूंच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

# युजवेंद्र चहलने रचला इतिहास

## भारताकडून टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा पहिला गोलंदाज



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४चा ५६वा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात भारतीय संघाचा फिरकीपटू युजवेंद्र चहलने मोठी कामगिरी आपल्या नावे केली.

युजवेंद्र चहलने दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतला बाद करीत एक विकेट मिळवली, पण या विकेटसह चहलने टी-२० क्रिकेटमध्ये इतिहास घडवला आहे.


युजवेंद्र चहल हा टी-२० क्रिकेटच्या इतिहासात ३५० विकेट घेणारा पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे.

भारतीय गोलंदाज म्हणून चहलने मोठा पराक्रम आपल्या नावे केला आहे. भारताकडून ढ२० मध्ये सर्वाधिक ३५० विकेट घेण्याचा विक्रम युजवेंद्र चहलच्या नावावर झाला आहे.

चहलनंतर पियुष चावला या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याच्या नावावर ३१० विकेट्स आहेत. यानंतर रविचंद्रन अश्विन ३१० विकेट्ससह तिसऱ्या स्थानावर आहे. भुवनेश्वर कुमार २९७ विकेट्ससह चौथ्या आणि अमित मिश्रा २८५ विकेट्ससह पाचव्या स्थानावर आहे.

# मॅथ्यू हेडनची लेकही हिटमॅनची फॅन

**मुंबई** : मुंबई इंडियन्स आणि सनराजयर्स हैदराबादचा सामना वानखेडे मैदानावर खेळवण्यात आला. ग्रेस हेडन म्हणजेच ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू मॅथ्यू हेडनच्या लेकीने या सामन्यापूर्वी मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांशी गप्पा मारल्या. ज्याचा व्हिडिओ स्टार स्पोर्ट्सने शेअर केला आहे. ग्रेस हेडनही चाहत्यांसोबत मुंबईचा राजा रोहित शर्मा असे म्हणत रोहितला चिअर करताना दिसला.



मॅथ्यू हेडन सध्या आयपीएल २०२४साठी भारतात असून त्याची लेक ग्रेस हेडन आयपीएल २०२४साठी स्टार स्पोर्ट्ससाठी प्रेझेंटर म्हणून काम करीत आहे. मुंबई-हैदराबादच्या सामन्यापूर्वी ग्रेस हेडनही रोहित शर्माला चिअर करताना दिसली. प्रेझेंटर असलेल्या ग्रेसने मुंबईच्या सामन्यापूर्वी वानखेडे स्टेडियमवर पोहचली होती. सामना सुरू होण्यापूर्वी स्टेडियमबाहेर मुंबईच्या चाहत्यांना भेटली आणि त्यांच्याशी गप्पा मारल्या.

# डॉजबॉल राज्यस्पर्धेत ठाणे वरिष्ठ पुरुष गटाचे यश

**कल्याण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनच्या मान्यतेने बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशनच्या माध्यमातून १२ वी वरिष्ठ गट पुरुष व महिला महाराष्ट्र राज्य डॉजबॉल अजिंक्यपद स्पर्धा बीड येथे ३ ते ५ मेदरम्यान झाली. या राज्य स्पर्धेत महाराष्ट्रातील सुमारे २५ जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत ठाणे वरिष्ठ पुरुष गटाने द्वितीय क्रमांक पटकावला.

ठाणे जिल्ह्यातील पुरुष गटातील खेळाडूंनी उपउपांत्य सामन्यात सोलापूर संघाचा ८ गुणांनी पराभव केला. उपांत्य सामन्यात ठाणे पुरुष गटाने पुणे संघाचा पाच गुणांनी पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केला. अंतिम सामना बीड जिल्ह्यासोबत झाला. अत्यंत अटीतटीच्या लढतीत बीड जिल्हा पुरुष गटाने ठाणे जिल्ह्याचा एक गुणाने पराभव केला.




ठाणे जिल्ह्यातील पुरुष गटातील खेळाडूंनी अत्यंत दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले. त्यामुळे पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी पुरुष गटात जीत सिंग, साहिल परदेशी व महिला गटात माहि पावसकर या खेळाडूंची निवड झाली.

स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळ्यात महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे सचिव डॉ. हनुमंत लुंगे, बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशन अध्यक्ष वकील बाबुराव अनारसे, सचिव डॉ. सुनील पंढरे, राज्य पंच हरीश काळे व श्याम धस आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्य स्पर्धेत ठाणे जिल्हा पुरुष संघाने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल ठाणे जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अंकुर आहेर, कार्यवाह सदाशिव पाचपोर, सर्व पदाधिकारी आणि गुरुनानक इंग्लिश स्कूलच्या ज्येष्ठ क्रीडा शिक्षिका लता पाचपोर महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संसदेचे अध्यक्ष डॉ. अशोक बहिरव, विजय थोरात, सुनिल पगारे, भगवान नरवाडे, सारंगधर बागडे आदींनी खेळाडूंचे कौतुक केले.

जीवेत् शरदः शतम्!

किशोर वाहुळकर

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
मयुरेश शेळके

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com